

# रसराज

पं. पद्माकर नरहर बर्वे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई.

# रसराज

३५८

(रागदारी संगीतावर आधारित निवडक बंदिशी)

ग्रंथकर्ता – पं. पद्माकर नरहर बर्वे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती : जून, १९९०

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य, साहित्य आणि संस्कृती मंडळ
नविन प्रशासन भवन
मुंबई - ४०० ०३२

(c) प्रकाशकाधीन

मूल्य : ३८/- रुपये

मुखपृष्ठ : सौ. वीणा राजन होले

मुद्रक :
सौ. शैलजा गणेश बर्वे
वेदविद्या मुद्रणालय
४१ बुधवार पेठ, पुणे ४११ ००२
टेलि. नं. ४४५९८३

# अर्पण पत्रिका

माझे कलाजीवन ज्यांनी घडविले ते माझ्या जीवनाचे शिल्पकार – माझे प. पू. दिवंगत माता पिता व वडिलबंधू यांच्या पवित्र स्मृतीस ही माझी कलाकृती भक्तीपूर्वक समर्पित !!

पद्माकर नरहर बर्वे



परम पूजनीय गुरु संगीत मार्तंड स्व. पं. ओमकारनाथ ठाकूर



माझे संगीतातील स्फूर्तीस्थान पितृतुल्य ज्येष्ठ बंधू कै. गोविंद नरहर बर्वे



ग्रंथकार व पत्नी डॉ. सौ. मालती बर्वे (पांडे)




गानवर्धनतर्फे पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरु श्री. वि. ग. भिडे यांचे हस्ते
'स्वरलयभूषण' ही पदवी स्वीकारताना

# भूमिका

रसिकांसमोर ज्या ज्या वेळी मला गाण्याचा योग आला तेव्हां पारंपारिक चीजाबरोबर स्व- रचित चीजाही मी गात आलो आहे. त्या चीजातील नवीन डौल पाहिल्यावर अनेक जाणकारांनी त्यांची प्रशंसा केली. या नवीन चीजा व त्यांतील सौंदर्यस्थाने पाहूनच अनेक विधार्थी - त्या शिकण्यासाठीं माझ्याकडे आकृष्ट झालेले आहेत. परंपरेला धक्का न लावता चीजात कांही नावीन्य भरण्याचा मी प्रयत्न केला आहे.

नवनवीन बंदिशी बांधताना माझा आत्मविश्वास वाढू लागला. त्याच बरोबर रागाकडे पहाण्याची दृष्टीही बदलली. परंपरेला न सोडता, अधिक सौंदर्याने नटलेल्या चीजा स्वयंस्फूर्तीने बांधत आलो. यात माझा मुख्य हेतु या संगीतात काव्याच्या दृष्टीने, रागाच्या मूळ स्वरात बदल न करता, नवीन भर घालण्याचा आहे. या चीजातील शब्द रागाच्या आत्म्यानुरुप असावेत, त्यांत रस असावा आणि बरोबर अर्थही स्पष्ट असावा हें माझें अुद्दिष्ट आहे. मी जसे गातो त्या अनुरूप चीजा असाव्यात, ही माझ्या मनांत सदासर्वदा रुजलेली भावना आहे. त्या अनुषंगाने मी आजपर्यंत वेगवेगळ्या रागांत, वेगवेगळ्या दृष्टीकोनातून, वेगवेगळ्या प्रसंगानुरूप, चीजा बांधीत आलो आहे. गुरूचे स्थान आमच्या भारतीय संगीतात इतके मोठे आहे कीं गुरूची श्रेष्ठता दाखविणाऱ्या अनेक बंदिशी पंरपरेत आहेत. मीही काही रचल्या आहेत.

चीजा बांधताना मला हाही अनुभव आला की केवळ प्रतिभा असून भागत नाही तर या प्रतिभेला यथायोग्य मार्गदर्शन करणारा गुरूही लागतो, या दृष्टीने आज ज्या कांही माझ्या रचना आपापल्या ढंगाने सिध्द झालेल्या आहेत, लोकप्रिय झालेल्या आहेत, त्यामागे गुरूचे मार्गदर्शन ही महत्वाची गोष्ट आहे. पुढे सरावाने या गोष्टी साधू लागतात. माझी पहिली चीज जेव्हां मी बांधली तेव्हां त्या चीजेची पूर्तता माझे सर्व प्रथम गुरू स्व, दिनकरराव पटवर्धन (ग्वाल्हेरचे स्व. शंकर पंडित यांचे शिष्य व कृष्णराव शंकर पंडित यांचे गुरु बंधू) यांनी केली. हमीर रागातील ही चीज आहे - 'चल हट अब मोहन श्याम'. श्री पटवर्धन स्वत: अुत्तम बंदिशकार होते. त्यांनी चीजा कशा बांधाव्या, चीजा म्हणजे काय याची कल्पना मला प्रथम दिली. माझे दुसरे गुरूजी महान कलाकार स्व. पं. ओंकारनाथ ठाकूर यांनी तर माझ्या संगीत जीवनात क्रांति घडवून आणली, त्यांचेहि मार्ग दर्शन बहुमूल्य ठरले. हे माझे ऋषितुल्य गुरु ३१ डिसेबंर १९६६ रोजी कृष्णरूप झाले. आज जवळ जवळ ४५० च्यावर वेगवेगळ्या रागांमध्ये माझ्या बंदिशी आहेत. त्याचे सर्व श्रेय माझ्या या दोघा गुरूजींना देतो. दुर्दैवाने आज ते दोघेही हयात नाहीत.

चीजा रचणाऱ्याला अंतर्मुख असणे आवश्यक आहे केवळ 'ट' 'ला' 'ट' 'री' ला री जुळवून काव्य होत नाही. त्यासाठी जीवनात अनुभव यावे लागतात. ज्ञान वाढावे लागते, दु:ख व दैन्यावस्था ही अुत्तम बंदिशकार होण्यास पोषक होतात. असा माझा समज आहे.

पटवर्धनजी आम्हा दोघा भावांना १९३४ पासूनच संगीताचे शिक्षण देत होते. ते स्वत गायक म्हणून लोकांसमोर कधीच आले नाहीत. त्यांच्याकडे जवळ जवळ पाच सहा वर्षे आम्ही तालीम घेतली. महिनोन महिने अेकाच रागाचा अभ्यास व्हायचा. त्यांच्या शिक्षणाचा मुख्य आधार म्हणजे स्व पं. विष्णु नारायण भातखंडे यांची पुस्तके, त्या पुस्तकांनुसार गाणे हा आम्हाला दंडक होता. पण त्या पुस्तकांतील नोटेशनबर हुकुम गाण्यात रूक्षता वाटू लागली. चीजा रचण्याकडे माझ्या मनाची प्रवृत्ती होण्यास हें अेक मोठे कारण आहे. याचा अर्थ असा नाही की कै पं. भातखंडे यांच्याबद्दल मला अनादर आहे. अुत्तर हिंदुस्तानी संगीताला आज जे काही अभिमानाचे स्थान आहे ते त्यांच्यामुळे आहे. ते ऋषितुल्य होते. आणखी अेक कारण असे की कित्येक खानदानी चीजांचा अपभ्रंश झालेला होता. केवळ स्वरांसाठी शब्द आहेत असे मला वाटू लागले.

माझा विश्वास आहे की प्रेरणे व्यतिरिक्त बुध्दीला योग्य दिशेने चालना मिळाल्याशिवाय बंदिशी तग धरू शकत नाहीत. त्यासाठी योग्य शब्द, काव्यात्मक चिंतन, भावप्रवणता आणि करूणेचा आंतरिक अुद्रेक इत्यादींची आवश्यकता असते. रागांचे स्वर निश्चित आहेत. त्यांचे एक स्वतंत्र व्यक्तिमत्व आहे. त्यामुळे त्यांचे रूप पूर्णतया बदलणे शहाणपणाचे होणार नाही. मिश्र राग अथवा पूर्णपणे स्वंतत्र राग निर्माण करणे ही गोष्ट वेगळी. पण त्यात प्रचलित रागांचा अंश वा घटक नसणे अशक्य आहे. जो पर्यत सप्तकात आठवा स्वर मिळत नाहीं तो पर्यत अगदी स्वतंत्र राग निर्माण होणे शक्य नाही, अितकी आमची राग व्यवस्था निकोप व सुंदर आहे.

जर अखाद्या रागात बंदिश बांधायची असेल तर स्वरांच्या ढाच्यात शब्दांची रचना करावी लागते. त्यामुळे अेक गोष्ट निर्विवाद आहे की, कविते प्रमाणे काव्याला इथे अग्रस्थान नाही. शास्त्रीय संगीतातील चीजात रागस्वरांना अधिक महत्त्व आहे. तरीही कित्येकदा असे होते की चीजा रचताना काव्य व स्वर अेकाच वेळी जन्म घेतात. आणि त्यात फुलांच्या सुगंधाप्रमाणे भाव सुगंध भरून टाकतात. कित्येकदा अनुरूप शब्द न सुचल्याने चीज अर्धवट रहाते असाही अनुभव आहे. या प्रक्रियेत नवराग निर्मितीही मला आपेआप सुचत गेली. चीजा बांधताना मी कधी स्वरांचे तर कधी शब्दांचे अनुसरण केले. कधी कधी तर शब्द व स्वर हातात हात घालून एकदम जन्माला आले. असो.

अुत्तम स्वररचना व अुत्तम शब्दरचना कशाला म्हणावी ? मला असे वाटते कीं, अनुरूप शब्द अर्थानुकूल स्वरावलीत रचणे म्हणजे अुत्तम स्वररचना व शब्दरचना. ज्या स्वर पंक्तीतून रागाची ओळख पटकन होते त्या स्वर पंक्तींना आपण अुत्तम स्वर रचना म्हणू शकतो. परंतु भावानुरूप शब्दाशिवाय स्वरांना पूर्णता असते कां ? रागाचे पोषण करणारे स्वर व मधुर नाद अुत्पन्न करणारे शद्ब यालाच अुत्तम स्वर व शब्द रचना आपण म्हणू शकतो कारण शब्द व स्वर परस्परांना पोषक असतात.

अंतर्मनातील विशिष्ट भावानुरूप रागस्वर विशिष्ट स्थानावर विशिष्ट रूपाने नियोजित करण्यात एक प्रकारचे भावचित्र अुभे रहाते. कित्येकदा अेकाच चीजेत अेकापेक्षा अनेक पंक्ती अनेक भावांना जन्म देतात. अशा वेळी राग-रसाचा निर्णय करणे कठीण होते अशा परिस्थितीत अेखाद्या रागाला कोणताहि अेक स्थायीभाव अथवा रस आहे हें ठरविणे कितपत योग्य होओील ? अशी बंदिश त्या रागाची प्रतिनिधी असताना जर असा प्रश्न अुभा राहिला तर आपण थोडे बुचकळ्यात पडू. पण अधिक विचारांती याचे अुत्तर आपणाला मिळू शकते.

समजा अेखादा राग एका विशिष्ट रसाचीच निर्मिती करत असताना चीजेतील काही पंक्तीतून विशिष्ट स्वरस्थानावर विशिष्ट मनोभाव प्रकट होत असतील तर रागाचा स्थायीभाव नाहीसा झाला असे म्हणता येणार नाही. कारण चीजेची स्वररचना अनेक मनोभाव प्रदर्शित करत असताना मनोभावांचा पाया रागरसावरच आधारित असतो या मनोभावांची पार्श्वभूमीच रागरस आहे. रागाला जर व्यक्तीची अुपमा दिली तर त्या व्यक्तीचा स्वभाव रागरसाप्रमाणे मानावा लागेल. आणि त्या व्यक्तीच्या स्वभावात प्रसंगानुरूप निर्माण होणारी भावना म्हणजे चीज, आणि त्या चीजेत येणारी स्वरसंगति. रागाला जर जमिनीची अुपमा दिली तर, त्या जमिनीचा कस होओील रागरस. आणि त्या जमिनीतून काढलेली वेगवेगळी पिके होतील चीजातून निर्माण होणारे विविध मनोभाव. ज्या प्रमाणे भिन्न स्वभावांच्या व्यक्तींवर एक विशिष्ट प्रसंग कमी-आधिक प्रभाव टाकतो त्याप्रमाणे भिन्न रसांच्या रागातील चीजा वेगवेगळा प्रभाव टाकतात.

विशिष्ट स्वरसंगतीतून निर्माण होणारे मनोभाव त्याच स्वर संगतीत मर्यादित असतात, व ती स्वर संगती मागे पडली की ते मनोभाव लुप्त होतात व दुसऱ्या स्वर संगतीनुसार दुसरे मनोभाव निर्माण होतात. असे हे भिन्न मनोभाव वगळता जे काही राहील तो होओील रागाचा स्थायीभाव — रस. अुदा. 'जारे जारे जारे जारे जा' ही शब्दावली जर वेगवेगळ्या स्वरपंक्तीत रचली तर त्यातून क्रोध, अनुकंपा, दु:ख वगैरे भावना निर्माण होतील.

अेखाद्या अत्यंत दु:खद प्रसंगाने प्रभावित झालेल्या व्यक्तीचा मूळ स्वभाव क्षणभर जसा झांकळून जातो तद्वत चीजेत येणारे अुत्कट भाव निर्माण करणारी स्वरसंगती रागाचा मूळ रस क्षणभर कां होओीना झांकून टाकते. याच कारणामुळे भैरवीसारख्या रागिणीत माझे गुरूजी स्व. पं. ओंकारनाथ ठाकूर 'जोगी मत जा मत जा' या बंदिशीत करूण रस ओतप्रत भरत असत. या अुलट स्व. पं. विनायकबुवा पटवर्धन याच बंदिशीत वीर रसाचा अभिनिवेश दाखवीत असत. माझे मत असे आहे की भैरवी ही शृंगाररसप्रधान रागिणी आहे.

रागरस आणि भावनांचे स्पष्टीकरण करण्यासाठी आणखी अेक अुदाहरण देतो-करूण रसात अेक चीज आहे कंसवध करण्यासाठी कृष्ण गोकुळ सोडून जात आहे. सारे गोकुळ दु:खित आहे. इतक्यात राधा येते आणि रथारूढ होणाऱ्या कृष्णाला म्हणते "अरे कृष्णा, प्रयाण करण्यापूर्वी थोडा वेळ तरी माझ्या घरी चल! "थोडेसे लोणी खाऊन जा." परंतु कृष्ण म्हणतो की ही वेळ तिच्या घरी जाण्याची नाही. यावर राधा रागावून म्हणते "अरे; इतक्यातच मला विसरलास ? इतका कठोर कां झालास ?" राधेच्या मनातील हा क्रोधभाव जर स्वरांच्या माध्यमातून दाखबायचा असेल तर तो विशिष्ट स्वर संगतीतूनच दाखवावा लागेल, - ही विशिष्ट स्वर संगती त्या चीजेतून वगळता अुरेल तो त्या चीजेतील अप्रत्यक्षरीत्या रागाचा स्थायीभाव. कोणत्याहि रागाचे स्वर त्याच रागाच्या एका विशिष्ट स्वर संगतीत जर रचले तर वेगवेगळे भाव दाखवतील. याचे अुदा. माझी अडाण्यातील "काहे मारे तीर, येही तोरी रीत", याचे विश्लेष्ण चीजे बरोबर दिलेले आहे.

म्हणून मला असे वाटते की, स्वर अेकाच वेळी दोन प्रकारचे कार्य करतात-रागरस दाखवणे व त्या स्वरात असलेल्या स्वयंभू शक्तीतून भावनांचा अुत्कर्ष करणे. तीच स्वरचना पूर्णत्व पावते जी गाताच त्या रचनेतील भाव पूर्णपणे स्पष्ट करते. अशी स्वर रचना असलेली, चीज ही अुत्तम चीज आहे, असे आपण म्हणू शकतो. दुसरा प्रश्न येतो शब्दांचा. एकाच अर्थाचे अनेक शब्द असतात जसे-भाग्य, नशिब, ललाट पण एखाद्या चीजेत एकच पर्याय आवश्यक ते माधुर्य व लालित्य निर्माण करील, या द्दष्टीने ज्या शब्दांत सुलभ अुच्चार व माधुर्य असेल अशा शब्दांना अुत्तम शब्द संगती म्हणावी लागेल.

ज्या शब्दरचनेत रचणाऱ्याच्या मनात येणारे भाव शब्द व्दारा ध्वनित करताच, स्पष्ट रूपांन साकार होतात तिलाच अुत्तम शब्द रचना म्हणावी लागेल.

चिमण्यांची चिवचिव, कोकिळेचे कूजन इत्यादि शब्द निसर्गातील वर्णनात या पक्ष्यांच्या संगीतासाठी वापरले गेले नाहीत तर त्यांच्या आवाजाचे शब्दचित्र पुरेपुर अुभे रहाणार नाही. नादपूर्ण शब्दांचा अुपयोग कुठल्याही चीजेला सुडौल करतो.

वरील विवेचनावरून असे म्हणता येईल की चांगली बंदिश ती की जिच्यात १) राग परिपोषण, रागांचे नियम व नाविन्य दिसून येते. (२) रचनाकाराला जर अेकापेक्षा आधिक भाव दाखवायचे असतील तर ते त्या त्या स्वरपंक्तीतून स्पष्ट अुभे रहातात. (३) शब्द रचना मधुर, लचीली ध्वनि व लालित्य पूर्ण आहे (४) नाद शब्द अधिकाधिक असतात. (५) सबंध रचनेत तालाचा डौल साधलेला असतो.

चीजेचे अथवा बंदिशीचे तालांग किंवा ताल प्राधान्य म्हणजे काय ?

१) कित्येक बंदिशी अशा असतात कीं, त्यांचा तालाशी संबंध त्या चीजेची सम सोडल्यास फारसा येत नाही. अशा चीजेत तालाचा जो कांही भाग आहे तो चीजेतील केवळ समेसाठी. अशी चीज एका ठराविक गतीत - जणुं सरळ रस्त्याने चालत आहे असे वाटते. तिच्यात कांही आंदोलने, कांही चढ अुतार नसतात. अशा चीजेस तबल्याची संगत आवश्यक आहे असे वाटत नाही. रेल्वेच्या समांतर धावणाऱ्या रूळा प्रमाणे जणूं अेका रूळावरून ताल व दुसऱ्या रुळावरून चीज धावत असते - अुदा- सदाशिव भजमना ही पांरपारिक चीज. (राग यमन).

२) काही बंदिशी अशा असतात कीं, तालावर त्यांचे अुत्कट प्रेम असते. पण ते विरोधाभासात. गरीब बिचाऱ्या तालाला वाटत असते कीं, चीजेचे त्याच्याशी वैर आहे. समेपुरतीच अशी चीज तालाशी हातमिळवणी करत असते परंतु तालाशी समरूपाने ओळख होते न होते तोच पुन्हा एक प्रकारचे औदासीन्य. अशा चीजेचा एकंदर ढंग असा असतो की तालाला ती चीत करू पाहते. तबला वादकाला अशा चीजे बरोबर संगत जरा जपून करावी लागते. अुदा. ''चल, जलदी कर , अब तो सजनी-पुरिया''.

३) कांही चीजा अशा असतात कीं, त्या गाताच दुसऱ्या तालाचा आभास निर्माण करतात. परंतु असा आभासात्मक ताल जर त्या चीजेला लावला तर तिला तो सहन होत नाही. ताल व सम कुठल्या कुठे जाऊन पडतात. त्या चीजेला कोणता ताल हवा आहे हें ती चीज सांगत नाही. आंत अेक आणि बाहेर अेक असा हा चीजेचा स्वभाव असतो. अशा प्रकारच्या चीजांचे अुदाहरण म्हणजे बहार रागातील 'चित चोरा चित चोरत चितवन तोरी' आणि सोहनी रागातील 'डारूंगी डारूंगी डारूंगी तोपे रंग सांवरिया'. या दोन्ही चीजात पहिलीचा व दुसरीचा ताल आहे अनुक्रमे एकताल व झपताल, पण आभास होतो तीनतालाचा.

४) काही चीजांमध्ये चिजेचा एखादा तुकडा दुसऱ्याच तालाचा आभास निर्माण क़रतो. बाकी चीजेचे चलन असे एकाच तालाचे असते अुदा.- बहार रागातील 'डार डार पात पात कोयलिया ही चीज. या चीजेच्या प्रारंभातच दादऱ्याचे वजन आहे पण चीज आहे तीनतालात.

५) काही चीजा तालांगाच्या दृष्टीने बांधेसूद असतात. तालाचे चीजेवर आणि चीजेचे तालावर प्रेम असते ते अेकमेकांचा प्राण असतात. हातात हात गुंफून डौलाने व आनंदाने चीज व ताल आपला प्रवास करतात. चीज थयथय नाचत असते व ताल तिला साथ देतो. एका क्षणांत इकडे तर दुसऱ्या क्षणांत तिकडे अशा प्रकारे ती डोलत असते व आपल्याबरोबर तालालाही ती झुलवीत असते. जणू एक प्रकारच्या नशेत ती धुंद असते. अशा चीजेला अन्य-ताल-पुरुष तिच्या जीवनात आलेला सहन होत नाही. चीजेचा मात्रे मात्रे वर खेळ चालत असतो तो इतका की ज्या श्रोत्यांना संगीतातील विशेष काही कळत नाही त्यांचीही मान चीजेच्या हिंदोळ्यावर डोलू लागते. अशा चीजा तालाच्या दृष्टीने सरस आहेत. थोर कलाकार स्व. फैयाजखाँ यांच्या आग्रा घराण्यातील बहुतेक चीजा या प्रकारात मोडतात म्हणून या घराण्याला 'रंगीले' घराणे म्हणत असतील तर नवल नाही. अशा बंदिशीतील शब्द रचना इतकी मधूर, गोंडस व लालित्यपूर्ण असते की त्या चीजा वांरवार अैकाव्याशा वाटतात. या प्रकारातील चीजा बोलतानांना सहज प्रेरणा देतात.

इथे अेका गोष्टीवर विशेष ध्यान द्यायला हवे तें हें कीं या प्रकारात मोडणाऱ्या बंदिशी श्रुंगाररसाला अधिक सहाय्यक होतात. अुदा :- वसंतातील 'पनघट वा ठाडो माअी' व परज मधील 'सखी नंदके लाल रसिया', तालांगाच्या दृष्टीने आणखीही प्रकार असूं शकतील.

थोडक्यात स्वर आणि शब्दांची पांच विशेष अंगे व तालांगापैकी एखादे-अंग, जी चीज दाखवत असेल ती, अशी चीज अुत्तम बंदिश म्हणता येअील. तालाचे अंग स्पष्ट करण्यात स्वर आणि शब्द हे दोन्ही कार्यशील असतात. पण शब्दांचे महत्त्व अधिक आहे, याच कारणामुळे कंठ गायन हे वाद्यगायना पेक्षा श्रेष्ठ आहे. एखादी स्वर मालिका तालाच्या दृष्टीने अुत्कृष्ट असेल पण त्या स्वर मालिकेचे शब्द रूप असे असू शकते की स्वर मालिकेतून जे तालांग दाखवायचे होते ते अयोग्य शब्द रचने मुळे स्पष्ट होत नाही. अुदा :- परज रागांतील 'सखी नंद के लाल' ही चीज. या चीजेत स्वर आणि शब्दांची रचना अशी आहे की ती चीज गाताच तिचे तालांग स्पष्ट दिसून येते. चीज तीन तालात आहे. चीजे ची पहिली ओळ अशी :-

| + | | | | - | | | | ० | | | | - | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | मं | ध | नि | सां | नि | ध | प | प | - | पमं |
| | | | | | | स | खी | नं | द | के | ऽ | ऽ | ला | ऽ | लऽ |
| | | | | - | - | | | | | | | | | | |
| ग | म | ग | - | ऽ | ऽ | | | | | | | | | | |
| र | सि | या | ऽ | ऽ | ऽ | | | | | | | | | | |

पण याच स्वरावलीत दुसरे शब्द टाकले तर तालाचे मूळ वजन नाहीसे होते. उदाहरणार्थ

| + | | | | - | | | | ० | | | | - | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | मं | ध | नि | सां | नी | ध | प | - | प | पमं |
| | | | | | | क | र | त | का | न्हा | मो | से | ऽ | ब | रऽ |
| ग | म | ग | - | - | - | | | | | | | | | | |
| जो | ऽ | री | ऽ | ऽ | ऽ | | | | | | | | | | |

विशिष्ट मात्रांवर जेव्हा वजन किंवा जोर दिला जातो, मग तो सहेतुक असो वा नसो, तालांग स्पष्ट होतें,

६) हा आकृतीबंध निर्माण करणे म्हणजेच तालांग स्पष्ट करणे होय.

सा रे ग रे सा सा
तु म म त जा ओ

आतां या स्वरावलीत हेचं शब्द जर वेगळ्या रीतीने ठेवले तर ते मूळ वजन नाहीसे होते. उदाहरणार्थ -

सा रे ग गरे सा सा
तु म ऽ मत जा ओ

सारे - ग रे सा सा
तुम ऽ म त जा ओ

शब्दांचे महत्त्व आणखी दुसऱ्या तऱ्हेने सांगता येईल. चीजेचा ताल किंवा स्वर न सांगता अथवा न गाता सुद्धा चीजेचे शब्द वाचू लागताच चीज कोणत्या तालांत

आहे हे सहज लक्षात येते - ज्या प्रमाणे कवितेच्या वृत्ताची - कवितेवरून कल्पना येते.

'भवानी दयानी, महा बाक बानी ।

सुरनर मुनिजन जानी, सकल बुधग्यानी ।- भैरवी

अथवा

दरबार की सुरत हर रंग बखानत,- नट भैरवी मेल, कर्नाट शास्त्र मत (दरबारी) या चीजा पहाताच यांचा ताल झपताल आहे किंवा

'शाम सुंदर मदन मोहन कुबरी संग प्रीत कीन्हो - या चीजेचा ताल दादरा आहे हे कळून येतें.

आता पर्यतच्या विवेचनात मी स्वर प्रधान, शब्द प्रधान आणि ताल प्रधान चीजा कोणत्या आणि त्यांतील सर्वोत्तम प्रकार कोणता हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. आता आणखी अेका वेगळ्या दृष्टिकोनातून चीजे बद्दल सांगू इच्छितो.

चीज म्हणजे अेका पेक्षां आधिक स्वर वाक्यांचा समूह किंवा समुदाय. ज्या प्रमाणे वाक्य हे अर्थपूर्ण विधान असावे लागते त्या प्रमाणे स्वर वाक्यातही कल्पनेची किंवा विचारांची पूर्णता असणे आवश्यक आहे. वाक्याचा विस्तार, लघुता, क्लिष्टता अथवा सरळ पणा इत्यादी, कल्पना-शक्तीवर अवलंबून असतात त्याच प्रमाणे स्वर-वाक्याचा लहान मोठे पणा त्या त्या स्वर वाक्यात येणाऱ्या स्वरांवर अवलंबून असतो. ऩि रे ग, ग रे सा, ऩिध़, ऩिरेग, रेसा.

या स्वर वाक्यापेक्षा खालील स्वर वाक्य आधिक विस्तृत आहे :-

ध॒ निसां रें॒ सांरें॒ निसां

ध॒ सां नि ध॒ प प म॑ ग, म॑ ध॒ सां

पहिल्या स्वर वाक्यातील सुरूवातीचे ऩिरेग आणि दुसऱ्यातील ध॒ नि सांरें॒ सांरें॒ एवढेच स्वर जर घेतले तर असें वाटू लागते कीं या स्वरांत कांही कमतरता आहे. या स्वरपंक्तीत आणखी कांहीं स्वरांचा समावेश केल्या शिवाय मनाला समाधान मिळत नाही. पण पूर्ण स्वरावली गाताच मन संतुष्ट होते. ही संवेदना-अनुभूती स्वर वाक्यांच्या पूर्णतेचा आधार बनते. प्रत्येक स्वर-वाक्यात एक पूर्णता असते. ती ते स्वर वाक्य गाताच किंवा ऐकताच लक्षात येते. समजा एखाद्या तबला वादकाचे स्वंतत्र तबला वादन आपण अैकतो आहोत. त्यात त्याने खालील बोलांची अुपज केलेली आहे- धा किट तक धुम, किटतक धित्ता कडान् ऽ धा. या बोलात जो पर्यत कडानूधा हा बोल तीनदा वाजत नाही तो पर्यत मनाला समाधान मिळत नाही. या वरील बोलाला त्याने तीनदा वाजवल्याबरोबर तो जेव्हा समेवर येतो तेव्हां श्रोतृगणाच्या मुखातून 'वाहवा वाहवा' हे प्रशंसोद्गार स्वयंस्फूर्त बाहेर पडतात आनंदाची अनुभूती सगळ्यांना येते. याचे कारण असे की, ह्या समेवरच त्या बोलाची ज़ी पूर्ति आहे ती श्रोत्यांच्या मन:पूर्तीशी अेकरूप होते.

स्वर वाक्याचे रूप अेकप्रकारे असेच आहे, स्वरवाक्यांना अेक निश्चित प्रारंभ व अंत आहे म्हणून स्वर वाक्य त्यालाच म्हणता येअील की ज्याच्यात एक पूर्ण कल्पना आहे. अशा स्वर वाक्यांचा संयोग म्हणजेच चीज अथवा बंदिश. संगीताच्या व्याकरणात चीज हे एक प्रकारचे संयुक्त वाक्य आहे. भाषेतील संयुक्त वाक्यात ज्या प्रमाणे काही लहान मोठी गौण वाक्ये व एक प्रधान वाक्य असते त्याच प्रमाणे चीज रूपी संयुक्त वाक्यात प्रधान व गौण, स्वर-वाक्ये असतात. चिजेचा मुखडा किंवा तोंड हे प्रधान वाक्य म्हणता येईल त्यात येणारी तालाची सम त्या चिजेची सम होते. बोलण्याच्या भाषेत ज्या प्रमाणे पूर्णता दाखवणारे चिन्ह पूर्ण विराम आणि अर्धविराम, स्वल्पविराम आदि चिन्हे असतात तसाच प्रकार चीजेत असतो. अेखादी बंदिश अथवा चीज तालाच्या मर्यादेत लिहिलेल्या स्वर वाक्यांचा निबंध असतो. चीजेच्या बंधनात जो रचयिता अुत्तम स्वर व शब्दाद्वारें कल्पना भरतो त्याचीच बंदिश अुत्तम समजली जाते.

आतापर्यंत आलेल्या विवेचनातून सारांशाने आपण म्हणूं शकतो कीं, बंदिश अथवा चीज म्हणजे शब्द द्वारा गुंफलेल्या स्वर-वाक्यांचा ताल बद्ध आलेख अथवा स्वरचित्रभाव.

आज जवळ जवळ चाळीस वर्षापासून मी चीजा बांधत आहे. आणि जवळ जवळ पांचशे चीजा बांधलेल्या आहेत. या सर्व चीजा एकाच ग्रंथात छापणे अशक्य आहे. त्यामुळे कांहीं निवडक चीजांचा संग्रह या पुस्तकात दिला आहे. बहुतेक चीजा प्रचलित - ताल आणि मध्य लयीत आहेत. त्या मानानें विलंबित ख्याल कमी आहेत. विलंबित ख्याल कमी रचण्याच्या मागची भूमिका अशी की त्यांत ज्या संदर्भाने मी आता पर्यंत चीजा बांधत आलो आहे त्यांत ख्यालाला विशेष वाव नाही. विलंबित ख्याल हे प्रामुख्याने स्वर प्रधान असल्याने त्यांत शब्दांचा अुपयोग बहुतांशी स्वरांना तालात कायम कराण्यासाठी असतो त्यामुळे अनेकदा आवर्तन पूर्ण करण्यासाठीं शब्दांतील अक्षरांची खेचाखेच होते. शिवाय परंपरागत विलंबित ख्याल आहेतच. ते रागाचे मूर्तिमंत स्वरूप अुभे करतात. माझ्या मते मुख्य अडचण येते ती डौलदार आणि बैठक मारून नेणाऱ्या मध्यलयीच्या आकर्षक चीजांची. म्हणून मध्यलयीच्या चीजा मी आधिक बांधलेल्या आहेत.

राग गायन हें प्रामुख्याने स्वर गायन जरी असले तरी ते लय-ताल गायनही आहे. शास्त्रीय संगीतातील चीजांचे शब्द म्हणजे केवळ स्वर टांगण्याच्या खुंट्या आहेत असे म्हणणे बरोबर नाही. आणि समजा तसे मानले तरी त्या खुंटया ओबडधोबड तरी असू नयेत. हे मी निश्चित मानतो कीं, शास्त्रीय संगीतातील बंदिशी या कविता नव्हेत. पण तराण्यातील अर्थहीन शब्दातूनही लालित्य, वैचित्र्य, राग दर्शन इत्यादी जर स्पष्टपणे दिसून येते तर ते चीजातूनहि कां होऊ नये ? म्हणून चीजांना शब्द-सौष्ठव व अर्थभाव असावा असे मी मानतो.

माझ्या जवळजवळ सर्व बंदिशी व्रज भाषेत आहेत. माझी मातृभाषा मराठी, तेव्हां कांही ठिकाणी एखादा दुसरा शब्द चुकण्याचा संभव आहे. पारंपरिक हिंदीतील कित्येक शब्दांचा अर्थही कळत नाही. तेव्हा वाचक क्षमा दृष्टीने माझ्याकडे पहातील अशी मला आशा आहे.

या ग्रंथात आलेल्या रागांचा खास असा क्रम ठेवलेला नाही. पण नाम साद्दृश्याने येणाऱ्या रागांचा क्रम आपणास ठोकळ मानाने दिसून येअील. जसे - कल्याण प्रकार, तोडी प्रकार आणि कित्येकदा एकाच थाटातून निघणारे राग-असाही क्रम मी ठेवला आहे.

स्वर लेखन पद्धती कै. पं. विष्णू नारायण भातखंडे यांची आहे. कारण ती सर्वात सोपी व सरळ आहे. आवश्यक त्या चीजांचा अर्थ मराठीतून दिलेला आहे. प्रचलित रागांची रागवर्णनें मी दिलेली नाहीत कारण ती आज अनेक ग्रंथातुन अुपलब्ध आहेत. कै. भातखंडे यांचे हिंदुस्तानी संगीत पद्धती हे ग्रंथ मी आधार ग्रंथ मानले आहेत. याचा अर्थ असा नाही की इतर ग्रंथकारांची रागविषयक मते मला अग्राहय आहेत. माझे ठाम मत आहे कीं, कै. भातखंडे साहेबांनी अुत्तर हिदुस्थानी शास्त्रीय संगीताला पुनर्जीवन देअुन त्यांत एक-सुत्रता आणून जे महान कार्य केले आहे तसे आजपर्यंत दुसऱ्या कुणीही केलेले नाही. केवळ त्यांच्याच परिश्रमामुळे आज सुशिक्षित समाजात शास्त्रद्दष्टया भारतीय संगीताला प्रतिष्ठा मिळालेली आहे. आज कुणी कितीही पुस्तके लिहोत, कै. भातखंडे साहेबांच्या पुस्तकाचा आधार घेतल्या शिवाय ती व्यक्ति पुढे जाअू शकत नाही. मी रचलेल्या रागांतील चीजा रागादि वर्णनाबरोबर शेवटी दिलेल्या आहेत.

ज्या ज्या लोंकानी हा ग्रंथ पुरा करण्यास मला साह्य केलें त्यांचा मी अत्यंत आभारी आहे. सर्वांचा नामनिर्देश करणे अशक्य आहे. परंतु खालील व्यक्तींचा नामनिर्देश केल्याशिवाय रहावत नाही. नोकरी निमित्त वरचेवर बदल्यांमुळे पुण्यात मी कधीच स्थायिक झालो नव्हतो पण निवृत्ती नंतर सन १९७८ पासून पुण्यात स्थिर झालो आहे. पुण्यात कांही शिष्य वर्ग निर्माण झाला. तो आकाशवाणीवर नेहमी होणाऱ्या माझ्या कार्यक्रमातून गायल्या गेलेल्या माझ्या चीजांमुळें आणि गायकी मुळे. पुण्या बाहेरील रसिकांनीही माझ्या चीजांचे खूप कौतुक केले आहे. कित्येकांना त्या हव्याशा वाटल्या म्हणून माझ्याशी पत्र व्यवहारही केलेला आहे.

अनेक संगीत चर्चा सत्रातूनही गायल्या गेलेल्या माझ्या चीजा रसिकांना खूप आवडल्या आहेत. या आधी मुंबई दूरदर्शन वरून 'प्रतिभा आणि प्रतिमा' मध्ये झालेला माझा कार्यक्रम माझ्या स्वरचित चीजांवरच आधारित होता.

पुण्यांतील अेक प्रसिद्ध बंदिशकार स्वर्गीय उस्ताद महंमदहुसेन खॉं यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यांतील एक नामवंत संगीत संस्था 'गानवर्धन' तर्फे माझ्या चीजांचा खास कार्यक्रम आयोजित केला गेला होता. या सर्व बाबी मला या चीजा

प्रसिद्ध करण्यास स्फूर्ती देणाऱ्या झाल्या आहेत.

चीजांचे स्वर लेखन शक्य तो साधें आणि सरळ केलें आहे.एक गोष्ट इथे लक्षांत ठेवण्या सारखी आहे की खऱ्या अर्थाने संगीत, विशेषत : कंठसंगीत, हे लिहिले जाऊ शकत नाही. त्यामुळे मी जशा या चीजा म्हणतो त्या प्रमाणे त्या नोटेशन मधून त्या प्रमाणात लिहिता येणार नाहीत हें जाणून भविष्य काळांत या चीजा कॅसेट रूपातून काढण्याचा विचार आहे. या ग्रंथाच्या प्रकाशनात माझी पत्नी डॉ. सौ. मालती बर्वे (पांडे) यांचा सिंहाचा वाटा आहे. कारण हें सर्व लिखाण त्यांनी संसाराची जबाबदारी संभाळून वेळात वेळ काढून-सह धर्म चारिणी म्हणून केलं आहे. तिचे आभार मानणे हा निव्वळ औपचारिक-पणा होईल.

कळत वा नकळत ज्या ज्या थोर कलावंतांनी माझ्या ज्ञानात भर घातली त्यांचे आभार मानून रसिकां समोर हा छोटासा ग्रंथ नम्रभावनेने सादर करीत आहे. कृपाभिलाषी.

५/५/८९.

॥ कृष्णार्पण मस्तु ॥

प्रभाकर बर्वे.

## एका कलाकाराच्या द्दष्टिकोनातून 'रसराज'

संगीताच्या माध्यमातून आम्ही अेकत्र आलो-पती पत्नी झालो. परंतु सर्व प्रथम ते माझे गुरु आहेत. या ग्रंथाच्या प्रकाशना निमित्ताने त्यांच्या 'रसराज' या बंदिशींच्या पुस्तकांसंबधी त्यांची शिष्या व एक कलाकार या नात्याने मला काय वाटते या संबंधीं चार शब्द ! खरं म्हणजे हें माझं धाडसच आहे. पण गुरुआज्ञा प्रमाण मानून प्रस्तुत पुस्तकासंबंधीचे माझे विचार मी मांडीत आहे. अन् ते ही जास्तीत जास्त त्रयस्थपणे.

'रसराज' या पुस्तकाच्या प्रकाशनाने लेखकाची जन्मभराची तपश्चर्या सुफलित होत आहे याचा आनंद त्यांच्या पेक्षा ही कांकणभर अधिक मला होत आहे. कारण पुस्तकाच्या लेखनात माझा हातभार लागला आहे आणि संगीता संबंधीचा वैचारिक व भावनिक द्दष्टिकोन, जो माझ्या या गुरुमुळे मला मिळाला आहे, त्या बद्दल अंशत: तरी अुतराअी होण्याचं समाधान मला मिळतंय.

बंदिशी रचावयास संगीताचे सखोल ज्ञान, भावनिक द्दष्टिकोन हा जितका महत्त्वाचा तितकंच काव्यगुण असणं ही ही महत्त्वाची गोष्ट आहे. प्रस्तुत बंदिशीत हा गुण प्रकर्षाने जाणवतो. ही देणगी त्यांना त्यांच्या आईकडून मिळालेली आहे.

संगीताच्या माध्यमातून कलाकाराला जे कांहीं सांगावस वाटतं, आपलं मनोगत व्यक्त करावसं वाटतं, ते स्वराविष्कारातून तो सांगतोच, पण त्याला शब्दांची जोड मिळाल्यावर हा आविष्कार अधिक सुस्पष्ट व प्रगल्भ होतो. म्हणूनच स्वरांना तितक्याच प्रभावी शब्दांची जोड मिळणं आवश्यक असतं - अशा आविष्कारातून निर्माण झालेली कलाकृती म्हणजेच बंदिश !

अनेक कलाकारांच्या अुत्तमोत्तम स्वरचित बंदिशी आपण अैकतो. वैयक्तिक मनोधारणा व गायकी यामुळे प्रत्येक बंदिश ही नावीन्यपूर्णच वाटते, अेकमेकीहून वेगळी भासते. एखादी सुंदर शब्दालंकारांनी नटलेली, तर अेखादी सुंदर स्वर - विन्यासाने अलंकृत झालेली, तर कुणी कुशल नर्तिके प्रमाणे तालावर पदन्यास करीत असलेली दिसते. सारांश, कलाकाराच्या गायकींच व प्रतिभेचं मूर्तिमंत प्रतिबिंब त्याने. रचलेल्या बंदिशीत आपल्याला दिसतं.

परंतु अुत्स्फूर्त बंदिश आणि सहेतुक, सविचार बांधलेली बंदिश यात जेव्हा फरक आढळतो तेव्हा बंदिश कशी बांधावी, ती वेगवेगळ्या दृष्टिकोनातून कशी बांधली जाते, अुत्तम बंदिश कोणती; अशा अनेक मुद्यांचं तौलनिक व अभ्यासपूर्ण असं सुंदर विवेचन श्री. बर्वे यांनी या पुस्तकाच्या भूमिकेंत केलेलं आहे.

स्वर प्रधान, ताल प्रधान, शब्द प्रधान बंदिशी म्हणजे काय याचं विस्तृत विवेचन सोदाहरण करून शेवटी ते म्हणतात की बंदिश म्हणजे अेक़ा पेक्षा अधिक स्वर शब्द वाक्यांचा ताल बद्ध सूमह किंवा शब्दद्वारां गुंफलेल्या स्वर वाक्यांचा तालबद्ध आलेख. अथवा स्वरचित्र भाव. आणि हें अुत्तमपणे व्यक्त करणारी बंदिश अुत्तम

बंदिश ठरते.

हे विचार नवीन पिढीतील कलाकारांना ज्यांच्यात काव्यगुण आहेत-अशांना निश्चितच मार्गदर्शन पर होतील असा मला विश्वास आहे.

अशा अुत्तमोत्तम निवडक बंदिशींचा खजिना लेखकाने ह्या पुस्तक रुपानं वाचकांना दिलेला आहे. भावना प्रधानता हा विशेष गुण श्री. बर्वे यांच्या गाण्यात प्रामुख्यानं असल्याने तोच गुण त्यांच्या बंदिशीतही पुरेपुर अुतरला आहे. निव्वळ बंदिश बांधायची म्हणून बांधली गेलेली नाही. बंदिशींना शोभेशी स्वर रचना व ताल यांचा समन्वय प्रत्येक बंदिशीतून दिसतो. उदाहरणार्थ, दरबारी कानड्यातील विलंबित ख्यालाची रचना, 'श्री गुरुदेव दत्त' ही दत्तात्रयांचा महिमा वर्णन करणारी ही बंदिश. यांतील भावप्रमाणे तितक्याच धीर गंभीर स्वरांतून प्रकट व्हावयास हवी. या साठी दर बारी कानड्यासारखा गंभीर, भारदस्त राग त्यांनी निवडला यात फार मोठं औचित्य साधलेलं आहे. समजा हाच ख्याल त्यांनी शंकरा किंवा कामोद, केदार सारख्या रागात रचला असता तर इष्ट तो परिणाम साधला नसता. रागाप्रमाणे बंदिश झूमरा तालात बसवल्यामुळे झुमऱ्यासारख्या आड लयीच्या तालाने या बंदिशीला अेक वेगळंच वजन प्राप्त झालेलं दिसतं.

तसंच शुध्दसारंगातील 'सुंदर कंचन लागे चमकन' हा ख्याल व 'धन जानकी' ही सीता स्वयंवराची चीज. ह्या दोन्हीही रचना स्वर व शब्द यांचा सुंदर मिलाफ म्हणून अुत्कृष्ट बंदिशी म्हणतां येतील.

बंदिश मनांत ठसण्यासाठी अत्यंत सोपी व सुटसुटीत काव्य रचना आवश्यक असते. जें तत्त्व भावगीताला लागू आहे तेच तत्त्व शास्त्रीय संगीताच्या बंदिशीलाही, कारण बंदिश म्हणजे रागदारी - संगीतावर आधारीत भावगीत अशी व्याख्या केल्यास फारसे चूक होणार नाही. क्लिष्ट शब्द रचना व अवाजवी विस्तार ह्याच जसं भावगीताला कुपथ्य आहे तसंच बंदिशीलाही असते. म्हणूनच मर्यादित विस्तार आणि सोपी शब्दरचना हें पथ्य या बंदिशींच्या रचनेत कटाक्षाने पाळलेलं आहे.

यासाठीं त्यांनी केलेली व्रज भाषेची निवड समर्पक वाटते. कारण ही भाषा अत्यंत मृदू व रसाळ आहे. कठोर पणा त्यांत नांवालाही नाहीं. मला आठवतं कीं दिल्लीला आम्ही असतांना दिल्ली आकाशवाणीनं 'व्रजमाधुरी' या कार्यक्रमासाठी माझ्या कडून व्रजभाषेतील कांही बंदिशी ध्वनिमुद्रित करून घेतल्या होत्या अर्थातच या बंदिशी श्री. बर्वे यांच्याच होत्या. परंतु अैकणाऱ्यांना शंकाही आली नाहीं इतक्या त्या खानदानी व जुन्या वाटल्या.

वेगवेगळ्या अंगाने बंदिशी कशा बांधाव्यात यांच नुसतं विवेचन करूनच ते थांबले नाहीत तर हे विवेचन त्यांनी प्रत्यक्षात अुतरवले आहे असेच आपणास आढळून येअील. अुदा. तालाशी खेळ करणाऱ्या बंदिशी. यांच कारण म. खाँ फैय्याजखांसाहेब यांच्या गाण्याचा पुष्कळसा ठसा श्री. बर्वे यांच्या गायकी वर अुमटला आहे. तसंच

वेगळ्या तालाचा आभास निर्माण करणाऱ्याही बंदिशी यांत दिसतील. सोहनी रागांतील 'डारुंगी डारुंगी डारुंगी' ही चीज वास्तविक आहे झपतालात पण आभास निर्माण करते अेकतालाचा आणि तबलजी पटकन अेकतालच पकडतात हा माझा अनुभव आहे,तशीच बहारातील अेक बंदिश - 'चित चोरा चित चोरत' ही आहे अेकतालात. पण अैकणाऱ्यांना त्रितालाचा आभास निर्माण करते,

वेगवेगळ्या वजनाने अस्ताई अंतऱ्यात येणारी तिहाओी हाही अेक मनोरम प्रकार बंदिशींमध्ये आहे. जयजयवंती रागांतील 'जाओ जी जाओ जी ह्म से क्या मचाओी' ही अेकतालातील चीज आहे. या चीजेत शेवटी अस्ताई अंतऱ्यात येणारा 'पराओी' शब्द अेकच असला तरी त्यातुन दोन वेगवेगळे अर्थ सूचित करतो. अस्ताईत तो 'परकी' किंवा दुसऱ्याची' अशा अर्थाने येतो व अंतऱ्यात तो पारखी झाली असा अर्थ सूचित करतो. बसंत बहारातील 'डारुंगी डारुंगी' ही अेकतालातील बंदिश. यात अस्ताओी - अंतऱ्यात यैणारा 'भारी' हा शब्द वेगळ्या अर्थाने व वेगळ्या वजनानं दोन्ही वेळेस आलेला आहे.

संवादात्मक बंदिशीही त्यांनी हाताळल्या आहेत. पुरिया रागांतील 'चल जलदी कर अब तो' किंवा अहिर भैरवातील 'हाथ कंगना को' अशां सारख्या पुष्कळ बंदिशी आपल्याला दिसतील.

शब्दांची कसरत करणाऱ्या अनुप्रासात्मक बंदिशी ही यांत आहेत. अुदा - गुनी जन कहत गुनी को गुनी (बहार), झनझन झांजे झांजरिया (चंद्रकौस), तन कपत मन डरत अतही सोच (कर्नाटश्री) चित चोरा चित चोरत (बहार).

त्यांच्याकडे शिकायला येणाऱ्या विद्यार्थ्यात जसे अुनभवी विधार्थी आहेत तसेंच नवशिकेही आहेत. अशा नवशिक्या विद्यार्थ्यासाठी त्यांनी सोप्या सोप्या बंदिशी बांधल्या आहेत. संगीत विद्यालयांतून अथवा शाळांतून संगीत शिकण्याऱ्यांची, ही फार मोठी गरज आहे असं मला वाटतं. अशा प्राथमिक विधार्थ्यांना पेलतील, म्हणावयास सोप्या जातील अशा बंदिशींची रचना होणं आवश्यक आहे.

सारांश, वेगवेगळ्या ढंगाच्या, वेगवेगळ्या बांधणीच्या बंदिशी रचून प्रस्तुत्त लेखकानं या पुस्तकाच्या रूपानं अुत्तर हिंदुस्तानी संगीतात मोलाची भर टाकली आहे असे मला प्रामाणिक पणें वाटतं.

क्वचित कांहीं बंदिशी उत्स्फूर्त - तिथल्या तिथे स्फुरलेल्या आहेत हा अेक आश्चर्याचा भाग आहे. भारत गायन समाजात गाताना श्री बर्वे यांना तिथल्या तिथे अेक रचना स्फुरली. आभोगी कानड्यातील ख्याल संपविल्यावर अेकदम माझ्या कानीं चीजेचे शब्द आले 'बजी रे बजी सांवरियाकी अत ही मधु धुन मुरली की'. क्षणभर मी आश्चर्यचकित झाले कारण ही बंदिश मी कधीच अैकली नव्हती बंदिशीची सम ठेवली होती तार सप्तकांतील गंधारावर कृष्णाच्या मधुमुरलीचा अैकणाऱ्याच्या तनमनावर होणारा परिणाम व त्याची तीव्रता साधण्यासाठी केलेला तारसप्तकांतील

कोमल गंधाराचा अुपयोग हा लेखकाचं बुद्धि कौशल्य व स्वरांचा समयोचितपणाच दर्शवितो. या बैठकीला स्व. मास्तर कृष्णराव, कै. नरहरी बुवा पाटणकर कै. आबासाहेब मुजुमदार वगैरे जाणकार मडंळी हजर होती. आणखीही अेक प्रसंग सांगते. प्रस्तुत लेखकास आकाशवाणीत नौकरी लागली. त्यानिमित्ताने मित्रमंडळींनी त्यांच्या गाण्याची मैफल आयोजीत केली होती. अैकणारे मित्र होते पण संगीताचे शत्रू होते, गाणं चालूं असतां कुणी गप्पा मारीत होते, कुणी जांभया देत होते. अशा प्रसंगी बंदिश स्फुरली 'दरबार की सुरत तो देखो, कोअी अलसाये, कोअी सोये' आणि हें म्हणतांक्षणी सारी मंडळी खडबडून जागी झाल्यासारखी होऊन मग अेक चित्ताने गाणं अैकू लागली.

अशा अुत्स्फूर्त रचना करायला तितकीच तरल प्रतिभा व जबरदस्त काव्यगुण हवा.

या बंदिशी अैकायला जितक्या गोड तितक्याच म्हणायला अवघड आहेत. कारण मात्रा मात्रा गणिक शब्द व त्यासाठीं लागणारा दमसास. शिवाय त्या त्यांच्या अनोख्या गायकी ढंगात बांधलेल्या असल्यानं गाणाऱ्याच्या गळ्यांतून तंतोतंत अुतरण्यातच त्या बंदिशीचं सौंदर्य आहे.

या बंदिशी शिकवताना लेखकाला अैकणं हा अेक अनोखा अनुभव असतो कोणतीही चीज किंवा राग शिकवताना प्रथम त्या बंदिशीचा अर्थ, मग त्या रागाचं स्वरूप, त्यांतील बारकावे तर ते सांगतातच. पण अमुक एक स्वर संगति वाढवली तर कोणत्या रागाची छाया त्या रागावर पडते, ती टाळण्यात कटाक्षाने काय करावं, हे विस्तृतपणे सांगण्यात लेखकाची हातोटी आहे. कोणता स्वर कशा पद्धतीनं लागला पाहिजे आणि तो तसा कां, हे ही ते विधार्थ्याला विविधतऱ्हेने समजावून देतात. सारांश, ते जसे अुत्तम रचनाकार आहेत तसेच अुत्तम शिक्षकही आहेत. खरं म्हणजे त्यांची बुद्धी सर्वगामी आहे. कोणत्याही विषयात तेवढाच रस घेऊन खोलवर विचार ते करतात. म्हणूनच मला पुष्कळदा वाटतं ते अुत्तम इंजिनिअर होऊ शकले असते, वकील होऊ शकले असते, तसेच अुत्तम प्रोफेसर ही होऊ शकले असते. नौकरी केली नसती तर संगीतात ही ते अुच्च शिखरावर पोचले असते.

एक कलाकार या नात्याने माझ्या दृष्टिकोनातून दिसणाऱ्या त्यांच्या बंदिशी व त्यांचं विविध पैलू असलेलं व्यक्तिमत्त्व या संबधी लिहलेले हे विचार वास्तवतेला धरुन आहेत. अतिशयोक्तीचा त्यांत लवलेशही नाही. व्यक्तिमत्वाचा उल्लेख वाचकांना कदाचित अवाजवी वाटेल पण व्यक्तिमत्वाला असलेले अनेक पैलू अप्रत्यक्ष रित्या बंदिशींच्या रचनांना कारणीभूत आहेत असं मला वाटतं.

मानवी भावनांचा बहुरंगी आविष्कार तर या बंदिशीतून दिसतोच पण 'श्री कृष्ण' हे त्यांच आराध्य दैवत असल्यानं पुष्कळशा बंदिशी या विषयाशी निगडीत आहेत. इतकेच नव्हें तर ग्रंथाची समाप्ती देखील त्यांनी कृष्णाच्या भुवनमोहिनी मुरली वर

आधारित बंदिशीने केली आहे.

हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत व श्रीकृष्ण यांचं अतूट नातं सर्वज्ञात आहे. नव्हे आपल्या संगीतास मिळालेला तो अेक अमोल वारसा आहे. अशा आगळ्या ढंगानं व आगळ्या धाटणीनं नटलेल्या या बंदिशींचा हा संग्रह 'रसराज' रसिकांना निश्चितच स्वागतार्ह वाटेल असा मला विश्वास आहे.

डॉ. सौ. मालती बर्वे.

**स्वरलिपि चिन्ह**

मंद्र सप्तक के स्वरके नीचे बिन्दु होता है । ऩि

तार सप्तक के स्वरके अुपर बिन्दु होता है । सां

मध्य सप्तक के स्वरको कोअीभी चिन्ह नहीं । प म ग अित्यादि

कोमल स्वर के नीचे आडी रेखा होती है । नि

तीव्र स्वर के अुपर खडी रेखा होती है । मं

जिस स्वर के आगे जितनी आडी रेखांए होती हैं, अुस स्वर को अुतनी ही मात्रा बढाकर गाते हैं । ग -- (तीन मात्रा)

जिस शब्दकें आगे जितने अवग्रह चिन्ह हो, अुस शब्द को अुतनी ही मात्रा बढाकर गाते हैं । जो ऽ ऽ ऽ (चार मात्रा)

एक मात्रामें अनेक स्वर लेने हों तो स्वरों के नीचे कंस लगाया जाता है । रेगमप

स्वर के अुपर इस प्रकारके चिन्ह को मींड कहते है । ग प

किसी स्वर के अुपर के स्वरको कण स्वर समझना चाहिये । मप

सम +

काल ०

अन्य तालियोंके लिए क्रमश: २, ३, ४ आदि संख्याए लगाते हैं ।

**ये स्वरलिपि चिन्ह स्व. पं. भातखंडे पध्दति के है ।**

## इस पुस्तकमें आये हुए ताल

## तीनताल (त्रिताल)

मात्रा=१६, सग-१, काल-९, टाळी-१,५,१३.

खंड - ४ (४+४+४+४)

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| धा | धिं | धिं | धा | धा | धिं | धिं | धा | धा | तिं | तिं | ता | ता | धिं | धिं | धा |
| + | | | | २ | | | | ० | | | | ३ | | | |

## एकताल

मात्रा -१२, सम -१, काल -३,७, टाळी - १,५,९,११
खंड - ६, (२+२+२+२+२+२)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| धीं | धीं | धागे | त्रक | तू | ना | कत् | ता | धीं | त्रक | धी | ना |
| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |

## झपताल

मात्रा -१०, सम -१, काल - ६, टाळी १,३,८.
खंड - ४ (२+३+२+३)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| धी | ना | धी | धी | ना | ती | ना | धी | धी | ना |
| + | | २ | | | ० | | ३ | | |

## आडाचौताल

मात्रा - १४, सम -१, काल - ५,९,१३, टाळी - १,३,७,११.
खंड - ७, (२+२+२+२+२+२+२)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| धी | तिरकिट | धी | ना | तूं | ना | कत् | ता | तिरकिट | धी | ना | धी | धी | ना |
| + | | २ | | ० | | ३ | | ० | | ४ | | ० | |

## झूमरा

मात्रा -१४, सम -१, काल -८, टाळी -१,४,११.
खंड - ४ (३+४+३+४)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| धी | ऽ | धा,त्रक | धीं | धीं | धागि | त्रक | तीं | ऽ | ता,त्रक | धीं | धीं | धागि | त्रक |
| | | | २ | | | | ० | | | ३ | | | |

## धमार

मात्रा - १४, सम -१, काल -८, टाळी - १,६,११
खंड - ४, (५+२+३+४)

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | ध्धि | ट | धि | ट | धा | ऽ | क | त्ति | ट | ति | ट | ता | ऽ |
| + | | | | | - | | ० | | | - | | | |

## चौताल

मात्रा -१२, सम -१, काल -३,७ टाळी - १,५,९,११.
खंड - ६, (२+२+२+२+२+२)

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| धा | धा | दीं | ता | किट | धा | दीं | ता | तिट | कत | गदि | गन |
| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |

● ●

# अनुक्रमणिका (परिशिष्ठ - अ)

**१) राग - यमन**

१) जा चला जा चला जा (अेकताल)
२) अैसी करो ना बतिया (तीनताल)

**२) राग - शुध्दकल्याण**

१) हो गअी मनकी बाते (अेकताल)
२) जाने बलि बलको (अेकताल)
३) पियरवा आये आये (तीनताल)

**३) राग - श्यामकल्याण**

१) अे राधे तोरे बदनपर (अेकताल)
२) जा जारे जारे जा जारे (अेकताल)

**४) राग - जैतकल्याण**

१) तरपत हूं मीन जैसे (अैकताल)

**५) राग - पूरिया कल्याण**

१) कैसे धीर धरूं (तीनताल)
२) सांझ भअी मोरा रे (तीनताल)

**६) राग - गोरख कल्याण**

१) रतन की खान रे (अेकताल)

**७) राग - हमीर**

१) फूली चमेली बेलरिया (तीनताल)
२) चल हट अब मोहन श्याम (अेकताल)
३) रुंड माल त्रिशुल हात (चौताल)

**८) राग - केदार**

१) मंदर बाजे री (अेकताल)
२) झांझनवा झन् झन् झन् झन्के (तीनताल)

**९) राग - बिहाग**

१) जान सुजान मोरी (अेकताल)
२) आली री अलबेली नार (अेकताल)

१०) राग - बिहागडा
  १) सुखके दिन थे वोही (झपताल)
  २) सैर करने चलो राधे रानी (तीनताल)
११) राग - छायानट
  १) ये री मालनिया गूंदलाओरी (तीनताल)
१२) राग - नंद
  १) किसबिध पाऊं मैं (तीनताल)
१३) राग - शंकरा
  १) अे बैंया मोरी छोंड दे रे (तीनताल)
  २) अैसे कुटिल से जब बात (तीनताल)
१४) राग - हंसध्वनी
  १) तनिक सी तान अैसी लेवो (रूपक)
  २) पतिया लिख भेजी (तीनताल)
  ३) तानोम् तानोमृतन देरे (एकताल)
१५) राग - कलावती
  १) मीठी बातें करो मोसे (अेकताल)
१६) राग - भूप
  १) मोरे मन बसकर (आडाचौताल)
  २) महादेव देवन देव (रूपक)
१७) राग - देशकार
  १) भोंर ही आये (रूपक)
  २) मधुमास की मधुरात (तीनताल)
  ३) जागो जागो जागो नंदलाल (अेकताल)
१८) राग - नारायणी
  १) आनंद मनावो मंगल दिन आज (तीनताल)
१९) राग - भवानी
  १) गुन गावत हरि के माओ (तीनताल)
२०) राग - देवगिरी बिलावल
  १) मै सन लागी तोरी (अेकताल)
  २) मन के मोती तुम मेरे (तीनताल)

२१) राग - खमाज

१) खेलन को नही आयी (रूपक)

२२) राग - सरस्वंती

१) अे माअी मेरो (अेकताल)

२) घर मोरे आये नंदलाल (तीनताल)

२३) राग - भिन्नषड्ज

१) शाम मोहे दे दे (रूपक)

२) राम जनम आज (अेकताल)

२४) राग - निलांबरी

१) साजन बिन मोरी (तीनताल)

२५) राग - देस

१) मै चली चली चली (अेकताल)

२) धियाना दिर् दिर् (तीनताल)

२६) राग - जयजयवंती

१) अे मा तनिक बूंद (झपताल)

२) जाने दे जाने दे रे (रूपक)

३) जावोजी जावो जी (अेकताल)

४) सुझत नाही कछु (तीनताल)

२७) राग - सिंदूरा

१) आज तुम कैसे खेलत फाग (रूपक)

२) खेलत आज तुम कैसे हो फाग (धमार)

२८) राग - भीमपलास

१) छाँड देरे कलाअी (अेकताल)

२) जारे कगवा पियासो संदेसवा (तीनताल)

३) बनठन नार आज चली है (रुपक)

२९) राग - देसी

१) तोरे मोहन माअी (अेकताल)

२) तुमरे नयन तुमरो (तीनताल)

३) गुरुजन की कही मानोरे (तीनताल)

**३०) राग – कर्नाटश्री**
१) घन घोर घन दौर (झपताल)
२) तन कपत मन डरत (तीनताल)

**३१) राग – बागेश्री**
१) मोपे सखी (तीनताल)
२) देख आली सौतन घर (तीनताल)

**३२) राग – बिंद्रावनी सारंग**
१) बाजे बाजे मंदर सब (अेकताल)

**३३) राग – शुध्दसारंग**
१) सुंदर कंचन लागे (तीनताल)
२) धन जानकी बर पायो (तीनताल)

**३४) राग – गौडसारंग**
१) सूर साधे सब साधे (अेकताल)

**३५) राग – दरबारी कानडा**
१) श्री गुरुदेव दत्त (झूमरा)
२) जा जारे-जा जारे (अेकताल)
३) झन झन झनकवा बाजे (तीनताल)

**३६) राग – नायकी कानडा**
१) दरबार की सुरत तो (तीनताल)

**३७) राग – अभोगी कानडा**
१) बजी रे बजी सांवरिया की (तीनताल)
२) आज मथुरा नगर (अेकताल)

**३८) राग - अडाणा**
१) काहे मारे तीर (तीनताल)

**३९) राग – शहाना**
१) मैं निरास होत जात (तीनताल)

**४०) राग – मियामल्हार**
१) मै कभी नही तुमसे बोलूंगी (तीनताल)
२) बरसन लागीरे (अेकताल)

**४१) राग –गौड मल्हार**

१) जारे जारे जारे (तीनताल)

२) बरखा ऋत आओ (तीनताल)

३) सोहे जटाभार (झपताल)

**४२) राग – मेघ मल्हार**

१) मोरी पकर कर बैया (तीनताल)

**४३) राग – जयंतमल्हार**

१) घन घोरत घन दौरत (अेकताल)

**४४) राग – बहार**

१) चित चोरा चित चोरत (अेकताल)

२) डार डार पात पात (तीनताल)

३) टेसू के बन फूले (रूपक)

**४५) राग – बसंतबहार**

१) डार डार पात पात (अेकताल)

२) दीम् दीम् तदीम (अेकताल)

**४६) राग – मालकंस**

१) साहेब सत्तार (तीनताल)

२) चतुर सुधर बालमुवा (अेकताल)

**४७) राग – चंद्रकंस**

१) झन झन झांजे (अेकताल)

**४८) राग – संपूर्ण मालकंस**

१) कासे कहूं मनकी (झूमरा)

२) अैसो बिलम न करो (तीनताल)

**४९) राग – जोग**

१) तुमसा नही देखा (अेकताल)

**५०) राग – श्री**

१) डम डम डमरु (रूपक)

**५१) राग – बसंत**

१) पनघटवा ठाढो (तीनताल)

२) मधुवनी वसंत फुलला (तीनताल)

५२) राग - परज
    १) सखी नंदके लाल रसिया (तीनताल)
५३) राग - ललत
    १) बिरहन मैं दुख कैसे सहूं (तीनताल)
५४) राग - कोमल आसावरी
    १) ऐरी सुन सखी आज (रूपक)
    २) सगुन बिचार करो (तीनताल)
५५) राग - जौनपुरी
    १) ऐ री सखी आज (तीनताल)
    २) दीम् दीम् तदीम (अेकताल)
५६) राग - तोडी
    १) आज मोरे घर (झपताल)
    २) मै तो वारूं वारूं (तीनताल)
    ३) जा मैं तोसे (अेकताल)
५७) राग - भूपालतोडी
    १) मंद मंद बहत पवन (अेकताल)
५८) राग - बहादुरी तोडी
    १) दीन दयाल तुम (अेकताल)
५९) राग - लाचारी तोडी
    १) साजन बिन कैसे (तीनताल)
    २) दिन रात चैनन (अेकताल)
६०) राग - बिलासखानी तोडी
    १) ये कगवा कछु बोले (तीनताल)
    २) दिर दिर तदीम् (तीनताल)
६१) राग - मारवा
    १) कैसे कर जीये (तीनताल)
    २) झांझन झनके मोरा (अेकताल)
६२) राग - पूरिया
    १) चल जलदी कर (तीनताल)

**६३) राग – भटियार**

१) अनंग मदन मोपे (झपताल)

२) चुहूं चुहूं करत (तीनताल)

**६४) राग सोहनी**

१) डारूंगी डारूंगी (झपताल)

**६५) राग – शिवमत भैरव**

१) सुधर सलोने (तीनताल)

२) साँची साँची साँची कहो (अेकताल)

**६६) राग – अहीर भैरव**

१) आवो रिझावे (झूमरा)

२) हाथ कंगना (तीनताल)

३) घन झूम झूम आये (अेकताल)

**६७) राग – नट भैरव**

१) बरजोन माने (तीनताल)

**६८) राग – बिभास**

१) कनक कलश (अेकताल)

**६९) राग – भैरवी**

१) सैयाजी हो लाओ (तीनताल)

२) ठायी ठायीं स्वरराणी (अेकताल)

**परिशिष्ट (ब)**

**स्व–रचित राग**

**७०) राग – कल्याण बहार**

१) जब सुनी मन मोहन की (तीनताल)

**७१) राग – मलुहा तिलक**

१) रात अंधेरी (झपताल)

२) कैसे कर जीये (तीनताल)

**७२) राग – स्वर मोहिनी**

१) और न दूजो काज (एकताल)

२) बहुत दिन बीते (तीनताल)

**७३) राग – भटियारी दुर्गा**

१) कारी कारी घिर आओी (तीनताल)

**७४) राग - ललिता तोडी**

१) जा पर बीते (अेकताल)

२) जुगसूं रैन लागे (तीनताल)

**७५) राग - रसराज**

१) कन्हैया मोरा नादान (झपताल)

२) आओी आओी नओी ऋत (तीनताल)

## राग – यमन – अेकताल (म. ल)

**जा चला जा चला जा, जारे छेडोना हमरी बाट कन्हाओी ।।धृ।।**
**नीलज निठूर तुम, छेडत नार पन घट पर, काहूंकी तोरी**
**अैसी ढीठाओी ।।१।।**

अर्थ :- या चीजेत त्रागा, भांडण आहे, अर्थात त्या भांडणामागे प्रेमाचीच भावना आहे. "माझी वाट अडवु नकोस कृष्णा । आतां तू निघून जा बरं ! पाणवठ्यावर आमच्या सारख्या नारींना तू नेहमी छेडत असतोस. इतका तू निर्लज्ज आणि निष्ठूर आहेस. असं कसं तुझं धारिष्टय ?

### स्थायी

| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सानि | ध़ | नि़ | रे | ग | - | निध | पम॑ | रे | सा | - | सा |
| जा | ऽ | च | ला | जा | ऽ | चऽ | लाऽ | जा | जा | ऽ | रे |
| सा | ध़ | नि़ | निध | पम॑ | प | पम॑ | गरे | गध | पम॑ | गरे | सा |
| छे | डो | ना | हऽ | मऽ | री | बाऽ | ऽऽ | टऽ | कऽ | न्हाऽ | अी |

### अंतरा

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| म॑ | नीध | पम॑ | ग | म॑ | ध | सां | सां | - | सां | सां | सां |
| नी | ऽऽ | ऽऽ | ऽ | ल | ज | नि | ठू | ऽ | र | तु | म |
| नी | रें | गं | रेंसां | निध | प | निध | पम॑ | गध | पम॑ | गरे | सा |
| छे | ड | त | नाऽ | ऽऽ | र | पऽ | नऽ | घऽ | टऽ | पऽ | र |
| सा | ध़ | नी़ | नीध | पम॑ | प | पम॑ | गरे | गध | पम॑ | गरे | सा |
| का | हूं | की | तोऽ | ऽऽ | री | अैऽ | ऽऽ | सीऽ | ढीऽ | ठाऽ | अी |

## राग - यमन, ताल-तीनताल (म. ल.)

**अैसी करो ना बतिया, तुमरे बिन मोहे चैन नही आवे ।।धृ।।**
**तुमरे कारन सब कछु छौंडी, रैन दिना पिया अबना सहावे ।।१।।**

अर्थ :- या चीजेत वैफल्याची भावना आहे. प्रियतमाला सर्वस्व अर्पण करूनही त्याला त्याची जाणीव नाही, याचं फार दुःख आहे तिला. म्हणून ती म्हणते, ''तु असे बोलू नकोस, तुझ्याशिवाय माझा अेकही क्षण सुखाचा जात नाही.कारण, तुझ्यासाठी सर्व काही सोडून मी आले. आता तुझं हे वागणं मला सहन होत नाही.

### स्थायी

| + | २ | ० | ३ |
|---|---|---|---|
| | | सा | - धृ - नी़ |
| | | अै | ऽ सी ऽ क |
| प़ - - - | रे - ग रे | सा - नि़ सा | धृ - नी़ रे |
| रो ऽ ऽ ऽ | ना ऽ ब ति | या ऽ तु म | रे ऽ बि न |
| ग मं धनी सांसा | नीसां नी प रेग | पप गरे सा ।। | |
| मो हे चैऽ ऽऽ | ऽन नही आऽ | ऽऽ ऽऽ वे ।। | |

### अंतरा

| + | २ | ० | ३ |
|---|---|---|---|
| | | | प प सां - |
| | | | तु म रे ऽ |
| सां - सां सां | ध नी रें गं | सांसां नीध प - | पमं गरे ग रे |
| का ऽ र न | स ब क छु | छौंऽ ऽऽ डी ऽ | रैऽ ऽऽ न दि |
| सा - नि़ रे | ग मं सां नि | प रेग सा । | |
| ना ऽ पि या | अ ब ना स | हा ऽऽ वे । | |

# राग - शुध्दकल्याण - अेकताल (विलंबित)

**हो गअी मनकी बातें पूरन**
**जब तें मोर पिया आअीला ।।धृ।।**
**सकल सिंगार करूंगी अब तो री**
**हुलसित मन जो पी मोर सजीला ।।१।।**

अर्थ - माझा प्रियकर आल्या बरोबर माझें. इप्सित साध्य झालें !
आता मी अुल्हासित मनाने माझ्या देखण्या प्रियकरासाठी सर्व शृंगार करेन

## स्थायी

| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | धसारेग<br>होऽऽग | रेसाधप<br>अीऽमन |
| प<br>की | -<br>ऽ | रेग<br>बाऽ | प<br>ऽ | रेग<br>ऽऽ | सा<br>तें | साध<br>पूऽ | सा<br>ऽ | सारे<br>रऽ | सा<br>न | ग<br>ज | गरे<br>बऽ |
| पग<br>तेंऽ | प<br>ऽ | (प)सां<br>मो | ध<br>ऽ | ध<br>र | -सां<br>ऽपि | प<br>या | ग<br>ऽ | रेग-रे<br>आऽऽअी | सा<br>ला | ।।धृ।। | |

## अंतरा

| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | गप<br>सक | सांध<br>लसिं |
| सां<br>गा | -<br>ऽ | -<br>ऽ | सां<br>र | सांध<br>कऽ | धसां<br>रुंऽ | सारेंग<br>गीऽऽ | सारेंगं<br>ऽऽऽ | सां-धसां<br>हुऽलऽ | पप<br>सीत | प<br>म | गप<br>ऽऽ |
| रे<br>न | -<br>ऽ | ग<br>जो | प<br>ऽ | सांध<br>पीऽ | धसां<br>ऽऽ | (ग)प<br>मो | ग,प<br>र,स | रे<br>जी | -सा<br>ऽला ।।१।। | | |

## राग - शुध्दकल्याण - अेकताल (म. ल.)

**जाने बली बलको,निरबल बल का जाने ? ।।धृ।।**
**गजबल वनराज जाने, बायस पिक गुन का जाने**
**गुनी गुनी को पहचाने ।।१।।**

अर्थ :- ही चीज गुण वर्णनपर आहे. जो सामर्थ्यवान आहे त्यालाच सामर्थ्याची कल्पना असते. दुर्बलाला शक्तीची काय कल्पना असणार ? कारण, हत्तीचं सामर्थ्य वनराज सिंहच जाणू शकतो. कावळ्याला कोकिळेच्या गुणाची काय किंमत ? गुणवानालाच गुणाची पारख असते.

### स्थायी

| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| निध़ | - | सा | - | - | - | परे | रे | नी़ध़ | ध़ | प़ | - |
| जा | ऽ | ने | ऽ | ऽ | ऽ | ब | ली | ब | ल | को | ऽ |
| सा | सा | ग | रे | ग | रे | ग | प | रेग | - | सा | - |
| नि | र | ब | ल | ब | ल | का | ऽ | जाऽ | ऽ | ने | ऽ |

### अंतरा

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गप | रे | ग | प | सां | ध | सां | - | सां | सां | ऽ | सां |
| गुऽ | ज | ब | ल | व | न | रा | ऽ | ज | जा | ऽ | ने |
| सांनि | ध | धगं | रेंगं | सां | सां | प | ध | प | ग | प | रे |
| बा | ऽ | यऽ | सऽ | पि | क | गु | न | का | जा | ऽ | ने |
| ग | प | सां | ध | सां | - | गध | पप | रेग | ग | सा | - |
| गु | नी | गु | नी | को | ऽ | पऽ | हऽ | चाऽ | ऽ | ने | ऽ |

## राग – शुद्ध कल्याण – तीनताल (म. ल.)

**पियरवा, आये आये ! हियमें आनंद ना समावे ।।धृ।।**
**बजाव बजाव सब तत – बितत – चतुर – सरस सूर–**
**सूरमें स्वामी घर आवे ।।१।।**

अर्थ :- या रागात अधिक तर शुध्द स्वर येत असल्याने रागाची प्रकृती धीर गंभीर आहे, त्यामुळे सात्त्विक भावना या रागात अधिक खुलुन दिसतात. या चीजेत सात्त्विक आनंद आहे अनेक दिवसांनी प्रियकर आलेला आहे. तेव्हा त्याचे सर्वात सुंदर स्वागत हें स्वरांनदातच व्हायला नको कां ? म्हणून ती म्हणते ''सख्यांनो, माझा प्रियकर आलेला आहे. माझ्या हृदयात हा आनंद मावत नाही. (तेव्हां) हे चतुर कलावतांनो, तुमच्या सर्व प्रकारच्या वाद्यांवर अेकाहून अेक असे सरस सूर वाजवा की ज्या योगे माझ्या स्वामीचें शुभागमन होओील.

### स्थायी

| + | २ | ० | ३ |
|---|---|---|---|
| | | रे ग पधप रे<br>पि य रऽऽ वा | - सा - सा<br>ऽ आ ऽ ये |
| प - ग -<br>आ ऽ ऽ ऽ | गप धप रे -<br>ऽऽ ऽऽ ये ऽ | सा ग रे गप<br>हि य में आऽ | रे ग प प<br>ऽ नं ऽ द |
| सांध सांरें सां ध<br>ना ऽऽ ऽ स | प- गप रे -<br>माऽ ऽऽ वे ऽ | | |

### अंतरा

| + | २ | ० | ३ |
|---|---|---|---|
| | | गप रे -रे रे<br>बऽ जा ऽव ब | ग प सां ध<br>जा व स ब |
| सां सां सां सां<br>त त बि त | सां रे सां सां<br>त च तु र | सां रें गं सां<br>स र स सू | ध सां प प<br>र स् र में |
| रे ग - गध<br>स्वा मी ऽ घऽ | प रे - सा<br>र आ ऽ वे | | |

## राग - श्याम कल्याण - अेकताल (विलांबित)

**अे राधे तोरे बदन पर**
**श्याम मिलन की-चोरी ॥धृ॥**
**बिखरे बाल मदभरे नैन**
**बात कछु आज कहत निराली ॥१॥**

अर्थ :- कृष्ण आणि राधा यांच्या मीलनाच्या खुण गांठीची ही चीज. राधेची सखी तिला म्हणते ''राधे ! तू चोरून कृष्णाला भेटलेली आहेस ! ह्या चोरीच्या खुणा तुझ्या अंगोपांगावर दिसताहेत. तुझा हा विस्कटलेला केशसंभार आणि मदोन्मत्त झालेले नेत्र आज कांही वेगळंच सांगताहेत.

### स्थायी

| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | रेमंपध | ग | मसा |
| | | | | | | | | | अेऽऽऽ | रा | ऽ,धे |
| ${}^{म}रे$ | म | ${}^{प}\dot{सा}$ | - | सा | मरे | ${}^{म}रे$ | - | मं | - | प | - |
| तो | ऽ | रे | ऽ | ब | दऽ | न | ऽ | प | ऽ | र | |
| रेमंपध | मं | प | प | ग | -,म | सा | ${}^{नि}रे$ | सा | ॥धृ॥ | | |
| श्याऽऽऽ | ऽ,ऽ | म | मि | ल | ऽ,न | की | चो | री | | | |

### अंतरा

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | ${}^{म}रे$ | मं | प,मंपसां |
| | | | | | | | | | बि | ख | रे,ऽऽऽ |
| सां | - | सां | ${}^{नी}ध$ | ${}^{नी}ध$ | सां | ${}^{नि}रें$ | सां | धनीप | म | रे | मं |
| बा | ऽ | ल | म | द | भ | रे | नै | ऽऽन | बा | त | क |
| प | रेमंपध | मं | प | म | रे,सा | रेमंपध | गमरे | सा | | | |
| छु | आऽऽऽ | ज | क | ह | त,नि | राऽऽऽ | ऽऽऽ | ली | ॥१॥ | | |

## राग - शामकल्याण - अेकताल (म. ल.)

**जा जारे जारे जा जारे, पकर न बैया मोरी, निलज निठूर**
**शाम मोहन तुम ॥धृ॥**
**छल बलिया पहचानी, कुटिल चाल तोरी आछि, नटखट**
**झटपट हटहट-खाओंगे गारी कन्हाओी तुम ॥१॥**

अर्थ :- तीव्र मध्यम कोणत्याही रागात एक प्रकारची आर्तता, करुणा आणतो. "हे निष्ठूर निर्लज्ज कृष्णा ! माझा हात तू पकडू नकोस तू मुकाट्याने जावेस हें बरे ! (तुझ्या पाया पडते) अशा जागी तू मला गाठलं आहेस की तुझी ही कुटिल रीत मी चांगलीच ओळखली आहे. हे नटखट ! तू लौकर जा नाहींतर माझ्या शिव्या खाशील.

स्थायी

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |
| म | रे | ऽ | मं | मं | प | ध | प | म | रे | सा | सा |
| जा | ऽ | ऽ | जा | ऽ | रे | जा | रे | जा | ऽ | जा | रे |
| रे | प | मं | प | गम | रे | सा | सा | प़ | सा | नि़ | रे |
| प | क | र | न | बैऽ | या | मो | री | नि | ल | ऽ | ज |
| सा | ध़ | नी | प़ | सा | - | सा | रे | मं | प | ध | ध |
| नि | ठु | ऽ | र | श्या | ऽ | म | मो | ह | न | तु | म |

## अंतरा

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प | प | सां | सां | सां | - | सां | सां | सां | - | सां | - |
| छ | ल | ब | लि | या | ऽ | प | ह | चा | ऽ | नी | ऽ |
| सांध | सांध | ध | सां | - | सां | सांनि | रें | सां | ध | नी | प |
| कु | टि | ल | चा | ऽ | ल | तोऽ | री | आ | ऽ | छी | ऽ |
| रे | मं | प | नी | सां | नी | मं | प | ग | म | रे | रे |
| न | ट | ख | ट | झ | ट | प | ट | ह | ट | ह | ट |
| रे | मं | प | गम | रे | सा | - | रे | मं | प | ध | ध |
| खा | ओ | गे | गाऽ | ऽ | री | ऽ | क | न्हा | आी | तु | म |

## राग–जैतकल्याण – अेकताल (म. ल.)

**तरपत हूं मीन जैसे तरपे जलबिन, मितवाके प्रेमबिन आली ।।धृ।।**
**जाय बस–गये बिदेस, बिरह अगन तपे आज, भोजन सेज अंग चुनर कैसी भावे ? आज आली ।।१।।**

अर्थ :- या चीजेत विरहव्यथा आहे. पाण्याशिवाय जशी मासोळी तडफडते तव्दतच माझ्या प्रियाच्या विरहाग्नीत मी होरपळून निधाले असताना मला, जेवणखाण, निद्रा, वस्त्र वगैरे कसे सुखावह होओल ?

### स्थायी

| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ध | प | ग | ग | सा | - | प़ | ध़ | प़ | सा | - | सा |
| त | र | प | त | हूं | ऽ | मी | ऽ | न | जै | ऽ | से |
| सा | सा | $^{प}$ग | - | प | प | सां | सां | सां | सां | सां | - |
| त | र | पे | ऽ | ज | ल | बि | न | मि | त | वा | ऽ |
| पप | ग | पग | ध | प | ग | - | सा | $^{प}$सां | - | पप | ग |
| केऽ | ऽ | प्रेऽ | ऽ | म | बि | ऽ | न | आ | ऽ | लीऽ | ऽ |

### अंतरा

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प | ग | प | सां | सां | - | सां | सां | सां | सां | - | सां |
| जा | ऽ | य | ब | से | ऽ | ग | ये | बि | दे | ऽ | स |
| सां | सां | सां | सां | सां | सां | सां | सां | - | प | ग | ग |
| बि | र | ह | अ | ग | न | त | पे | ऽ | आ | ऽ | ज |
| सा | ग | ग | ग | प | प | ग | प | प | सां | सां | सां |
| भो | ज | न | से | ऽ | ज | अं | ऽ | ग | चु | न | र |
| सां | - | गं | गं | - | सां | सां | - | सांसां | पप | ग | ग |
| कै | ऽ | सी | भा | ऽ | वे | आ | ऽ | जऽ | आऽ | ऽ | ली |

# राग- पूरियाकल्याण - तीनताल (म. ल.)

**कैसे धीर धरूं सजनी मैं समझत ना मोरी आली अब ।।धृ।।**
**जुग जुग जतन कियो हियमे री, जिसको, छुटो न जाय अब ।।१।।**

अर्थ :- करूण रसाचा हा राग असल्यानें यात विरह व दु:खाची भावना गांभीर्याने खुलुन दिसत असताना त्यात येणाऱ्या पंचमागुळे विरहाला शृंगाराचा साज चढतो.

सखे ! माणसाने धीर किती अन् कसा धरावा हेंच आता कळेनासे झाले आहे. (कारण) ज्या प्रियकराला युगायुगापासून अंत:करणात जतन करत आले तो आता दुरावणार तर नाही ?

## स्थायी

| + | २ | ० | ३ |
|---|---|---|---|
| | | नि़ रेम॑ ग सा | - नि़ध़ नि़ सा |
| | | कै ऽऽ ऽ से | ऽ धीऽ र ध |
| नी़ -ध़ प़ (नि)ध़ | नि़ रे सा - | रेसा नि़ध़ नि़ रे | ग - गम॑ धनि |
| रुं ऽऽ ऽ स | ज नी मैं ऽ | सऽ मऽ झ त | ना ऽ मोऽ ऽऽ |
| रें - नी ग | म॑ ग रे सा | | |
| ऽ ऽ री आ | ऽ ली अ ब | | |

## अंतरा

| + | २ | ० | ३ |
|---|---|---|---|
| | | ग ग म॑ ध | सां सां सां सां |
| | | जु ग जु ग | ज त न कि |
| नि रें नि ध | (ध)नी धप प - | म॑ध म॑प रे - | ग - गम॑ धनी |
| यो ऽ हि य | में ऽऽ री ऽ | जिऽ सऽ को ऽ | छु ऽ टोऽ ऽऽ |
| रें रें नि ग | म॑ ग सा नि़ | | |
| ऽ ऽ न जा | ऽ य अ ब | | |

## राग पूरिया कल्याण–तीनताल (म.ल)

**सांझ भअी मोरारे, लाडला प्यारा नटखट अलबेला, चंचललाल अज हुं न आयो ।।धृ।।**

**ऐसी बाट जोहत रही हुं, समझ्यो नाही, हमारे मनकी बिथा ये अब तो जी भर आयो ।।१।।**

अर्थ :- या रागाचा समय सायं संधी प्रकाश आहे. या रागात कारुण्य, भक्ती इत्यादी भावना खुलून दिसतात. त्यानुसार ही चीज ! आईचे अंत करण तीत स्पष्ट आहे. संध्याकाळ झालेली आहे आणि माझा लाडका, चंचलमनाचा कन्हैया अजून आलेला नाही. वाट तरी किती पहायची ? कसें कळत नाही याला ? माझे प्राण अगदी कंठाशी आले आहेत.

### स्थायी.

| + | | | | २ | | | | ० | | | | ३ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | - | - | - | ग | म॑ | ध | नी | सां |
| | | | | | | | | - | - | - | सां | ऽ | झ | ऽ | भ |
| नी | - | प | - | परे॒ | - | म॑ | ग | रे॒ | सा | - | सा | नी़ | रे॒सा | नी़ | ध़ |
| ओ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | मो | रा | रे | ऽ | ऽ | ल | ऽ | डऽ | ला | ऽ |
| नी़ | रे॒ | ग | रे॒ | म॑ | ग | रे॒ | सा | नि़ | सा | नी़ | - | ध़ | नी़ | रे॒ | ग |
| प्या | ऽ | रा | ऽ | न | ट | ख | ट | अ | ल | बे | ऽ | ला | चं | ऽ | च |
| रे॒ | गम॑ | प | प | ग | म॑ | ध | नीसां | नी | - | प | । | | | | |
| ल | लाऽ | ऽ | ल | अ | ज | हूं | नऽ | आ | ऽ | यो | । | | | | |

## अंतरा

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ग - मंध नीसां |
| | | | औ ऽ सीऽ ऽऽ |
| सां - सां सां | नी रें॒ नी ध | नी ध प - | प प रे॒ - |
| बा ऽ ट जो | ऽ ह त र | ही ऽ हूं - | स म झ्यो ऽ |
| ग - ग ग | मं धनी रेंगं गं | रें॒ सां - मं | धनी सां सां - |
| ना ऽ ही ह | मं रेऽ ऽऽ म | न की ऽ बि | थाऽ ऽ ये ऽ |
| सां नी प ग | मं ध नी सां | नी - प । | |
| अ ब तो ऽ | जी ऽ भ र | आ ऽ यो । | |

# राग – गोरख कल्याण – अेकताल (म. ल)

**रतन की खान रे ! अैसो अिक ही गुन नही, जानत जो नही श्याम ।।धृ।।**

**रस–गुन गुन–रस तुममें, अैसो भऱ्यो है, हम तो कह नही पावत तुम सचही अगम रे ।।१।।**

अर्थ :- या रागात येणारे शुध्द स्वर आणि कोमल निषाद अेक धीर गंभीर परंतु हळूवार भावना निर्माण करतात खालील चीजेत समर्पणाची भावना व्यक्त होते. तू रत्नाची खाण आहेस. अरे, तुझ्यात असा एकही गुण नाही जो तू जाणत नाहीत; म्हणून तू रत्नाची खाण आहेस, गुणांचा रस आणि रसांचा गुण याचें समतोल मिलन तुझ्यात इतके झालेलें आहे की त्याचे वर्णन करणे शक्य नाही तू खरोखर अगम्य आहेस.

## स्थायी

| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ध़ | सा | - | रे | म | सारे | नी़ | - | ध़ | सा | सा | - |
| र | त | ऽ | न | ऽ | कीऽ | खा | ऽ | ऽ | न | रे | ऽ |
| म | रे | म | - | सां | ध | सांरें | सांसां | ध | नी | ध | म |
| अै | ऽ | सो | ऽ | अि | क | हीऽ | ऽऽ | गु | न | न | ही |
| ध | ऽ | नी | ध | म | - | रेम | रेम | सा | - | - | सा। |
| जा | ऽ | न | त | जो | ऽ | नऽ | हीऽ | श्या | ऽ | ऽ | म |

## अंतरा

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| म | रे | म | म | सां | ध | सां | सां | सां | ध | सां | - |
| र | स | गु | न | गु | न | र | स | तु | म | मे | ऽ |
| सां | ध | ऽ | ध | मं | रेंसां | नी | - | ध | सां | - | - |
| अै | ऽ | ऽ | सो | ऽ | भऽ | ऱ्यो | ऽ | ऽ | है | ऽ | ऽ |
| सांरें | सांसां | ध | नी | ध | म | सांरें | सांसां | ध | नी | ध | म |
| हऽ | मऽ | तो | ऽ | क | ह | नऽ | हीऽ | पा | ऽ | व | त |
| ध | नी | ध | म | रे | म | रे | रे | म | सा | - | सा |
| तु | म | स | च | ही | ऽ | अ | ग | ऽ | म | ऽ | रे |

# राग - हमीर - तीनताल (मध्यलय)

**फूली चमेली बेलरिया, चंपा मोगरा खिले खुले सब, आरे आरे सांवरिया ॥धृ॥**
**बरन बरन के हरवा बनाये, बडे चावसे, चुन चुन कलिया बनके मालनिया ॥१॥**

अर्थ :- शबरीने ज्या भावनेने रामाला अुष्टी बोरे अर्पण केली तीच भावना या चीजेत व्यक्त झाली आहे. पण इथे तिला श्रृंगाराची छटा आहे चमेलीची वेल बहरली आहे. चाफा मोगरा फुललेले आहेत, तेव्हां माझ्या श्याम सुंदरा तू आता ये ! अनेक प्रकारच्या कळ्यांचे हार मोठ्या आवडीने मी तयार केले आहेत आणि ते सुध्दां अेक मालन बनून.

## स्थायी

| + | | | | २ | | | | ० | | | | ३ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | सांनि | धप | मंप | धनी | सांरें | सांनी | धप | पप | ग | म |
| | | | | | | फूऽ | ऽऽ | ऽऽ | ऽऽ | ऽऽ | लीऽ | ऽऽ | चऽ | मे | ली |
| नी | ध | नी | नी | सां | - | ग | म | धनी | सां | निसां | ध | नी | प | प | - |
| बे | ऽ | ल | रि | या | ऽ | चं | ऽ | पाऽ | ऽ | ऽऽ | मो | ऽ | ग | रा | ऽ |
| प | ग | म | प | गम | रे | सा | सा | म | ग | प | - | धनी | ग | - | म |
| खि | ले | ऽ | खु | लेऽ | ऽ | स | ब | आ | रे | आ | ऽ | रेऽ | आ | ऽ | रे |
| पनी | ध | नी | नी | सां | - | ॥ | | | | | | | | | |
| सां | ऽ | व | री | या | ऽ | ॥ | | | | | | | | | |

## अंतरा

| + | | | | २ | | | | ० | | | | ३ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | प | प | सां | सां | सांनि | रें | | सां |
| | | | | | | | | ब | र | न | ब | रऽ | न | | केऽ |
| ध | नी | सां | रें | सां- | धनी | प | - | प | धनी | - | ग | - | म | नी | ध |
| ह | र | वा | ब | नाऽ | ऽऽ | येऽ | | ब | डेऽ | ऽ | चा | ऽ | व | से | ऽ |
| ध | नी | सां | गं | मं | रें | सां | - | प | प | धनी | सां | - | पप | ग | म |
| चु | न | चु | न | क | लि | यां | ऽ | ब | न | केऽ | ऽ | ऽ | माऽ | ल | नि |
| नी | ध | नी | - | सां | - | । | | | | | | | | | |
| या | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | । | | | | | | | | | |

## राग - हमीर - अेकताल (मध्यलय)

**चल हट अब मोहन श्याम दूंगी अब तो गारी नटखट, हट छाँड बाअी, लपट झपट करन, झलके शीस मटकी भारी ।।धृ।।**

**तोसे कोन रार करत, तूं ही नित हमसे लरत-छलत छेडछाड करत हम तो कुलीन नारी ।।१।।**

अर्थ :- खोडसाळ कृष्णाने निमार्ण केलेले भांडण आहे हें. गोपी म्हणते, ''कृष्णा ! तू आता वाट सोडतोस की नाही ? नाहींतर शिव्या खाशील हं. अरे नटखट ! सोड माझा हात माझ्या अंगाशी असा झोंबू नकोस. पाण्याने पूर्ण भरलेली घागर आंतां सांडली आहे तूच नेहमी आमच्याशी भांडण अुकरुन काढतोस. तुझ्याशी भांडायाला आम्ही काय अडाणी आहोत ? आम्ही तर कुलीन घरच्या स्त्रिया.

### स्थायी

| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नी | ध | नी | सां | नी | ध | मं | प | धनी | मं | प | प |
| च | ल | ह | ट | अ | ब | मो | ह | नऽ | श्या | ऽ | म |
| प | मं | प | धनी | मं | प | ग | म | ध | - | - | - |
| दूं | ऽ | गी | अऽ | ब | तो | गा | ऽ | री | ऽ | ऽ | ऽ |
| म | नी | ध | प | मं | प | ग | म | रे | सा | - | सा |
| न | ट | ख | ट | ह | ट | छां | ऽ | ड | बा | ऽ | अी |
| सा | सा | सा | म | म | मग | प | प | प | ध | मं | प |
| ल | प | ट | झ | प | टऽ | क | र | न | छ | ल | के |
| प | मं | प | ध | मं | प | ग | म | ध | - | नि | सां |
| शी | ऽ | स | म | ट | की | भा | ऽ | री | ऽ | ऽ | ऽ |

## अंतरा

| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प | - | प | सां | - | सां | सां | - | सां | रें | सां | सां |
| तो | ऽ | से | को | ऽ | न | रा | ऽ | र | क | र | त |
| सां | ध | सां | - | सां | सां | रें | सां | सां | ध | ध | प |
| तू | ऽ | ही | ऽ | नि | त | ह | म | से | ल | र | त |
| ग | ग | म | ध | म॑ | प | ग | म | रे | सा | नि़ | सा |
| छ | ल | त | छे | ऽ | ड | छा | ऽ | ड | क | र | त |
| नी | सां | ध | नी | म॑ | प | ग | म | ध | - | नि | सां |
| ह | म | तो | कु | ली | न | ना | ऽ | री | ऽ | ऽ | ऽ |

# राग - हमीर - चौताल (धृपद)

**रुंड माल त्रिशुल हात, चंद्रमौली शिवशंकर, वाम अंक**
**गिरिजा स्थित, दुजे गणपती गणेश ॥धृ॥**
**व्याघ्रांबर आसन रुढ, बैठे है देवन के देव, निरखत सब**
**मुनीवर नर, नत मस्तक योगी महेश ॥१॥**

अर्थ :- हे एक धृपद आहे. बहुतेक धृपद गुणवर्णनपर अथवा भक्तीभावाची असतात. या धृपदात शंकराचे वर्णन आहे.

## स्थायी

| + | | ० | | २̲ | | ० | | ३̲ | | ४̲ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नि | ध | नि | सां | नि | रें | सां | नि | सां | ध | नी̲ | प |
| रुं | ऽ | ड | मा | ऽ | ल | त्रि | शु | ल | हा | ऽ | त |
| प | ग | ग | म | ध | प | ग | ग | म | रे | सा | सा |
| चं | ऽ | द्र | मो | ऽ | लि | शि | व | शं | ऽ | क | र |
| सा | - | सा | म | - | ग | म॑ध | म॑प | ग | म | नी | ध |
| वा | ऽ | म | अं | ऽ | क | गिऽ | रिऽ | जा | ऽ | स्थि | त |
| ध | नी | सां | रें | नी | सां | ध | नी̲ | ध | प | ग | म |
| दू | ऽ | जे | ऽ | ग | ण | प | ती | ग | णे | ऽ | श |

## अंतरा

| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प | - | सां | - | सां | सां | सां | सांनि | रें | सां | - | सां |
| व्या | ऽ | घ्रां | ऽ | ब | र | आ | सऽ | न | रं | ऽ | ढ |
| सां | ध | सां | - | सांनि | रें | सां | नि | सां | ध | नी | प |
| बै | ऽ | ठे | ऽ | देऽ | ऽ | व | न | के | दे | ऽ | व |
| ध | नी | सां | गं | मं | रें | नि | सां | ध | नी | प | प |
| नि | र | ख | त | स | ब | मु | नी | व | र | न | र |
| ग | ग | मं | ध | मं | प | ग | म | रे | सा | नि़ | सा |
| न | त | म | ऽ | स्त | क | यो | ऽ | गी | म | हें | श |

# राग – केदार अेकताल (मध्यलय)

**मंदर बाजेरी तत बितत घन सुशिर सब ।।धृ।।**

**बडी भोर नंदसदन धूमधाम मची आज, अपने लाडले के जनम दिन पर सब दे बधाअी ।।१।।**

अर्थ :- मंदिरातून वाद्यांचा झंकार निनादत आहे. अगदी पहाटे पासून नंदराजाच्या घरात धूम धाम चालेली आहे कारण आज आपल्या सर्वांच्या लाडक्या कृष्णाचा जन्म दिवस आहे. सर्व शुभचिंतनाचा वर्षाव करीत आहेत. अेकताल या चीजेस पोषक झालेला आहे.

## स्थायी

| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| साम | - | - | गप | - | मंप | मंध | - | - | म | - | म |
| मंऽ | ऽ | ऽ | द | ऽ | रऽ | बा | ऽ | ऽ | जे | ऽ | री |
| सारे | सा | पध | पमं | प | सांरें | सां | प | मम | रेसा | रे | सा |
| तऽ | ते | बिऽ | तऽ | त | घऽ | न | सु | शीऽ | रऽ | स | ब |

## अंतरा

| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प | म | -ग | प | - | प | पसां | - | सां | सां | सां | सा |
| ब | डी | ऽऽ | भो | ऽ | र | नंऽ | ऽ | द | स | द | न |
| सां | ध | ध | सां | - | सां | रें | सां | - | ध | - | प |
| धू | ऽ | म | धा | ऽ | म | म | ची | ऽ | आ | ऽ | ज |
| सा | मं | रें | सां | - | रें | सां | - | सां | ध | नी | प |
| अ | प | ने | ला | ऽ | ड | ले | ऽ | के | ज | न | म |
| म | मग | प | प | सांरें | सां | म | - | प | म | - | रेसा |
| दि | नऽ | प | र | सऽ | ब | दे | ऽ | ब | धा | ऽ | अी |

## राग- केदार - तीनताल (मध्यलय)

**झाँझनवा झन् झन् झन् झनके, तैसो ही जियरवा मनहि मन हुलसे ।।धृ।।**

**अब मोरे श्याम सुंदर कब निकसे ? मुरली संग ताल धरन पग तरसे ।।१।।**

अर्थ :-आनंद, सुख व्यक्त करणारा पण गंभीर प्रकृतीचा हा राग आहे ह्यांत तीव्र म थोडी आर्तता व कोमल निषाद अल्प मार्दव देतो. आपल्याला पुष्कळदा असे वाटते की अेखादी गोष्ट खूप छान झाली की तिचा प्रेरक तिथे असावा. कलेच्या बाबतीत तर ते प्रकर्षाने जाणवतें. या चीजेचा आधार हीच कल्पना. पायात घातलेले पैजंण रुणझुण करु लागताच मन आनंदाने अुचंबळून येते. अन् मग वाटतें, अशा वेळी माझा श्याम सुंदर केव्हा येणार ? कारण त्याच्या मुरलीवर ताल धरण्यास माझे पाय आतुरलेले आहेत. स्वर आणि लयीचा संगम म्हणजेच बंदिष ।।

### स्थायी

| + | | | | २ | | | | ० | | | | ३ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | प | सां | ध | म | मग |
| | | | | | | | | | | | झाँ | झ | न | वा | ऽऽ |
| प | - | - | प | - | प | सां | ध | म | - | - | मंध | प | म | - | सा |
| झन | ऽ | ऽ | झन | ऽ | झन | झ | न | के | ऽ | ऽ | तैऽ | सो | हि | ऽ | जि |
| रे | रे | सा | सा | म | मग | पमं | प | पसां | ध | म | । | | | | |
| य | र | वा | म | न | हिऽ | मऽ | न | हु | ल | से | । | | | | |

### अंतरा

| + | | | | २ | | | | ० | | | | ३ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | पम | प | म | - | प |
| | | | | | | | | | | | अऽ | ब | मो | ऽ | रे |
| सां | - | सां | सां | ध | नी | सांनि | रें | सां | धनी | प | म | मं | रें | सां | सां |
| श्या | ऽ | म | सुं | द | र | कऽ | ब | नि | कऽ | से | मु | र | ली | सं | ग |
| ध | नी | प | प | मं | प | सां | ध | मं | प | म | । | | | | |
| ता | ऽ | ल | ध | र | न | प | ग | त | र | से | । | | | | |

# राग - बिहाग - अेकताल (मध्यलय)

**जान सुजान मोरी तनिक बात अरे तुम पर वारी तन मन धन सब ।।धृ।।**

**मोरे प्रानकी आन, जावो ना अकेली छाँड अिस भँवरन में मोहे तुम मेरो आधार ।।१।।**

अर्थ :- तू सुजाण आहेस. तेव्हा माझं अैक ! लहानशी गोष्ट अैक ! अरे, तुझ्या वरून मी तन-मन धन अर्पण केले आहे. माझी तुला शपथ आहे, या जगात मला अेकटी सोडून तू जाऊ नकोस, तूच तर माझा आधार आहेस.

## स्थायी

| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ग | नी | नीध | प | - | ध | मं | प | ध | पप | ग | म |
| जा | ऽ | ऽऽ | न | ऽ | सु | जा | ऽ | न | मोऽ | ऽ | री |
| प | गम | ग | सा | - | सा | नि़ | प़ | नि़ | सा | ग | म |
| त | निऽ | क | बा | ऽ | त | अ | रे | तु | म | प | र |
| प | नीध | प | - | ध | मं | प | ग | म | ग | नि़ | सा |
| वा | ऽऽ | री | ऽ | त | न | म | न | ध | न | स | ब |

## अंतरा

| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ग | - | म | प | नी | नी | सां | - | - | सां | - | सां |
| मो | ऽ | रे | प्रा | ऽ | न | की | ऽ | ऽ | आ | ऽ | न |
| सां | गं | मं | गं | - | सां | रें | नी | प | ध | मं | प |
| जा | ऽ | वो | ना | ऽ | अ | के | ऽ | ली | छाँ | ऽ | ड |
| ग | म | प | नी | सां | नि | पमं | गम | ग | - | सा | - |
| अि | स | भँ | व | र | न | मेंऽ | ऽऽ | मो | ऽ | हे | ऽ |
| ग | म | प | नी | प | - | गम | प | म | ग | - | सा |
| तु | म | मे | ऽ | रो | ऽ | ऽऽ | ऽ | अ | धा | ऽ | र |

# राग - बिहाग - अेकताल (मध्यलय)

**आलिरी अलबेली नार वो जौ कर सिंगार–अपने पियाके दरसन के तो चली नहीन ? ।।धृ।।**

**का जानूं अुसके रंग मै बनठन के नित जात है– देखत हूं अपने मोहन के कने हर घरी हर दिन ।।१।।**

अर्थ :- एक दुसरीला म्हणते ''अग नेहमीच थाटामाटात असणारी ही आज शृंगार करून आपल्या पतीच्या घरी तर चालली नाहीं ना ? तोवर ती दुसरी म्हणते ''काय सांगू बाई ! नेहमीच अशा तऱ्हेने ती कृष्णाकडे जात असते. आज ती कुठे जाते हे मला काय ठाऊक ?

## स्थायी

| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | नि | - | नि | सां | - |
| | | | | | | | आ | ऽ | लि | री | ऽ |
| गं | रें | सां | नी | प | - | - | ग | - | म | ग | - |
| अ | ल | बे | ऽ | ली | ऽ | ऽ | ना | ऽ | र | वो | - |
| साग | मध | ग | म | ग | सा | - | सा | नि़ | प़ | नि़ | सा |
| जोऽ | ऽऽ | क | र | सिं | गा | ऽ | र | अ | प | ने | पि |
| ग | - | सा | - | ग | म | पनी | ध | प | - | गम | पध |
| या | ऽ | के | ऽ | द | र | सऽ | न | के | ऽ | तोऽ | ऽऽ |
| ग | म | ग | सा | - | सा | - | | | | | |
| च | ली | न | ही | ऽ | न | । | | | | | |

## अंतरा

| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ग | म | प | नी | सां | - | सां | नी | प | ग | म | म |
| का | ऽ | जा | ऽ | नूं | ऽ | अु | स | के | ऽ | ऽ | रं |
| नी | नी | सां | - | प | नी | सांगं | रें | सां | - | नी | प |
| ऽ | ग | मै | ऽ | ब | न | ठऽ | न | के | ऽ | नि | त |
| पनी | सां | नी | प | - | प | ग | म | ग | - | गम | पध |
| जाऽ | ऽ | त | है | ऽ | दे | ख | त | हूं | ऽ | अऽ | पऽ |
| ग | म | ग | रे | सा | - | - | ग | म | प | धनि | मप |
| ने | मो | ह | न | के | ऽ | ऽ | क | ने | ह | रऽ | धऽ |
| प | - | ग | म | ग | सा | ऽ | । | | | | |
| री | ऽ | ह | र | प | ल | ऽ | । | | | | |

# राग - बिहागडा - झपताल (विलंबीत)

**सुखके दिन थे वोही, सौतन जब न थी ।।धृ।।**

**मोरे नही आज रहे, असुके तो दास भये, मैं अभागी रही ।।१।।**

अर्थ :-कोणत्याही रागात कोमल निषाद आला की, कोमल भावना तो अधिक कोमल करतो आणि जोडीला शुद्ध निषाद आला म्हणजे त्यातला फरक विशेष जाणवतो. त्यातल्यात्यात चीजेची लय जेव्हा विलंबीत होते तेव्हां तर हा फरक प्रकर्षाने जाणवतो. लय वाढली की भावनेचे गांभीर्य कमी होते हे दाखवणाऱ्या या दोन चिजा. ''ते दिवस सुखाचे होते-जेव्हा माझ्या जीवनात सवत आलेली नव्हती. आज ते माझे राहिलेले नाहीत. इतकेच नव्हे तर तिचे दास झालेले आहेत. आणि मी ? मी अभागी आहे.''

## स्थायी

| + | | २ | | | ० | | ३ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प | ध | पपग | गम | रेग |
| | | | | | सु | ख | केऽऽ | दिऽ | नऽ |
| प | - | प | गम | पधसांनी | पनी- | -सांनी | धप- | धनीसांसानी | धपमंप. |
| थे | ऽ | वो | ऽऽ | हीऽऽ | सोऽ,ऽ | ऽ,ऽऽ | ऽऽ,ऽ | तऽऽऽऽ | नऽऽऽ |
| -धप | मग | गमधप-म | गरेसा | गमपधसांनी | | | | | |
| ऽजऽ | ऽऽ | बऽऽऽऽन | थीऽऽ | ऽऽऽऽ | | | | | |

## अंतरा

| + | | २ | | | ० | | ३ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | गम | पनी | सां | -गं | गं,रें |
| | | | | | मोऽ | रेन | ही | ऽआ | ज,र |
| सां | -,निसां | नी | धनीनी | धप | गं | रेंगंपंमं | गं | सां | पधनीसां |
| हे | ऽ,असु | के | ऽ,ऽऽ | तोऽ | दा | सऽऽऽ | ब | ने | मैंऽऽ |
| धपमंप,- | धपमग,- | गमधप,म | गरेसा | गमपधनी | | | | | |
| अऽऽऽ,ऽ | भाऽऽऽऽ | गीऽऽऽ,र | हीऽऽ | ऽऽऽऽऽ | | | | | |

# राग - बिहागडा - तीनताल (मध्यलय)

**सैर करने चलो राधेरानी, विधु किरन मुदित करत मन भारी ।।धृ।।**
**आज की री रात पूरन पुरन की, शीत पवन लहर अत भर डारी ।।१।।**

अर्थ :- राधे ! चल सहलीला जाऊ. चंद्राच्या प्रकाशात मन आनंदाने न्हाउन निघाले आहे. रात्र पौर्णिमेची आहे ! गार वारा सुटला आहे.

## स्थायी

| + | | | | २ | | | | ० | | | | ३ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | सा | ग | म | प | ध |
| | | | | | | | | | | | सै | ऽ | र | क | र |
| सांनी | सां- | ध, | प | - | गम | धप | म | गरे | सारे | सा, | सा | रे | रे | ग | ग |
| ने | ऽ | च | लो | ऽ | राऽ | ऽऽ | धे | राऽ | ऽऽ | नी, | वि | धु | कि | र | न |
| म | म | प | प | ध | ध | नी | रेंसां | नीध | पध | प | । | | | | |
| मु | दि | त | क | र | त | म | नऽ | भाऽ | ऽऽ | री | । | | | | |

## अंतरा

| + | | | | २ | | | | ० | | | | ३ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | ग | म | पनि | सां | नि |
| | | | | | | | | | | | आ | ज | कीऽ | ऽ | री |
| सां | - | सां | सां | गं | रें | गं | मं | गंरें | सांरें | सां | पध | नी | ध | प | प |
| रा | ऽ | त | पू | र | न | पू | न | मऽ | ऽऽ | की | शीऽ | ऽ | त | प | व |
| ग | म | प | ध | नी | धप | म | धप | मग | रेसा | सा | । | | | | |
| न | ल | ह | र | अ | तऽ | भ | रऽ | डाऽ | ऽऽ | री। | | | | | |

# राग - छायानट - तीनताल (मध्यलय)

**येरी मालनिया गूँद लावोरी, बरन बरन के फूल चुन चुन ।।धृ।।**
**फूल खिले गुलशन गुलशन में मोरे नंदलाल काजे -- ।।१।।**

भावार्थ - अग माळीणींनो विविध प्रकारची फुलं निवडून त्यांचे गुच्छ करा बरं ! बागे-बागेतून फुलांना जो बहर आलेला आहे तो माझ्या कृष्णासाठीच !

## स्थायी

| + | २ | ० | ३ |
|---|---|---|---|
| | प सां | - सां ध प | रे ग म प |
| | ये री | ऽ मा ल नि | या ऽ गूँ द |
| म ग म रें | सा -, - - | सा प़ सा सा | रे रे ग म |
| ला ऽ ऽ वो | री ऽ, ऽ ऽ | ब र न ब | र न के ऽ |
| प सांनि रें सां | धनि प । | | |
| फू लऽ चु न | चुऽ न । | | |

## अंतरा

| + | २ | ० | ३ |
|---|---|---|---|
| | | प - सां सां | सां - सां सां |
| | | फू ऽ ल खि | ले ऽ गु ल |
| रें गं मं रें | सां सां धनी प | प प रें रें | (सां) - धनी प |
| श न गु ल | श न मेंऽ ऽ | मो रे नं द | (ला) ऽ लऽ के |
| पप रेंरें सांनि धप | मग रेसा । | | |
| काऽ ऽऽ जेऽ ऽऽ | ऽऽ ऽऽ । | | |

## राग – नंद – तीनताल (मध्यलय)

**किसबिध पाऊं मैं अपने पिया को ॥धृ॥**
**जप तप साधन सब कछु कीन्हो,**
**होत न सफल, दुखवा अत मन को ॥१॥**

अर्थ :- माझा प्रियकर प्राप्त होण्यासाठीं मी काय करूं ? जप तप सर्व प्रकार केले. परंतु यश कशातच मिळाले नाही याचे मनाला फार दुःख आहे.

### स्थायी

| + | | | | २ | | | | ० | | | | ३ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | मध | प | रे | - | सा |
| | | | | | | | | | | | किऽ | स | वि | ऽ | ध |
| ग | - | - | - | म | - | म | ग | प | - | ग, | ग | म | प | - | ध |
| पा | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | अूं | ऽ | ऽ, | अ | प | ने | ऽ | पि |
| नी | - | - | - | प | ऽ | पध | नीध | पप | ग | म | । | | | | |
| या | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽऽ | ऽऽ | कोऽ | ऽ | ऽ | । | | | | |

### अंतरा

| + | | | | २ | | | | ० | | | | ३ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | प | प | सां | सां |
| | | | | | | | | | | | | ज | प | त | प |
| सां | - | सां | सां | नि | सां | नी | प | पध | नीप | पप | ग | ग | - | मध | पप |
| सां | ऽ | ध | न | स | ब | क | छु | कीऽ | ऽऽ | न्हो | ऽ | हो | ऽ | तऽ | ऽन |
| रे | रे | सा | सा | ग | म | प | धनी | पध | मंप | ग | । | | | | |
| स | फ | ल | दु | ख | वा | अ | तऽ | मऽ | नऽ | को | । | | | | |

## राग – शंकरा – तीनताल (मध्यलय)

**अे, बैया मोरी छाँड देरे निलज कान्ह कहती बार बार ।।धृ।।**
**देखें गांवके दुरजन लोग सब धरत नाम मोहे तब बार बार ।।१।।**

या रागातील चीजातून क्रोधादि भावना अधिक खुलून दिसतात.

### स्थायी

| + | २ | ० | ३ |
|---|---|---|---|
| | | गप निसां गंरें निसां | नीनी पप गरे सा |
| | | अेऽ ऽऽ ऽऽ बैऽ | ऽऽ याऽ मोऽ री |
| ग - - गप | (रें)ग - सा - | प़ नि़ सा ग | - ग प प |
| छाँ ऽ ऽ ड़ऽ | दे ऽ रे ऽ | नि ल ज का | ऽ न्ह क ह |
| निसां गंरें (प)सां - | नीनी पप गरे सा। | | |
| तीऽ ऽऽ बाऽ | रऽ बाऽ ऽऽ र | | |

### अंतरा

| + | २ | ० | ३ |
|---|---|---|---|
| | | ग - प सां | - सां सां - |
| | | दे ऽ खे गां | ऽ व के ऽ |
| नि सां नी प | नी ध सां नी | सां गं गंपं (रें)गं | - सां नी प |
| दु र ज न | लो ग स ब | ध र तऽ ना | ऽ म मो हे |
| नि सां सां - | नी पप गरे सा | | |
| त ब बा ऽ | र बाऽ ऽऽ र। | | |

## राग – शंकरा – तीनताल (म. ल)

**ऐसे कुटिलसे जब बात चीत होत तब काहे डरत ? ।।धृ।।**

**लाज न कुछ आवे ऐसे नंदनदन को हमरी छेड छाड करत ।।१।।**

अर्थ :- एका निरागस बालिकेला उद्देशून एक अनुभवी स्त्री म्हणते की, असा कुटिल कृष्ण तुझ्याशी बोलण्याचा प्रयत्न करेल तेव्हा मुळीच भिऊ नकोस अग ! ज्याला लाज नाही तो आपली छेडछाड करणारच.

### स्थायी

| + | | | | २ | | | | ० | | | | ३ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | पप | नीध | पप | गरे | सासा |
| | | | | | | | | | | | ऐऽ | सेऽ | कुऽ | टिऽ | लऽ |
| साप | ग | प | - | ग | - | ग | प | रेग | - | सा, | नि | - | प | सा | - |
| सेऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ज | ब | बा | ऽ | त, | चि | ऽ | त | हो | ऽ |
| सा | पप | सां | नी | - | प | पप | नीध | पप | गरे | सासा | । | | | | |
| त | तऽ | ब | का | ऽ | हे | डऽ | रऽ | तऽ | ऽऽ | ऽऽ | । | | | | |

### अंतरा

| + | | | | २ | | | | ० | | | | ३ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | सांसां | गंरें | सांसां | नि | प |
| | | | | | | | | | | | लाऽ | जऽ | नऽ | क | छु |
| सां | - | सां | सां | नी | पप | नी | ध | नि | सां | नी, | सां | नीध | पप | गरे | सासा |
| आ | ऽ | वे | ऐ | से | नंऽ | द | नं | द | न | को, | ज | बऽ | हऽ | मऽ | रीऽ |
| ग | प | ग | प | सां | नी | पप | नीध | पप | गरे | सासा | । | | | | |
| छे | ड | ड | छा | ऽ | ड | कऽ | ऽऽ | रऽ | ऽऽ | तऽ | | | | | |

# राग – हंसध्वनी – रूपक (साधारण विलंबीत)

**तनिकसी तान अैसी लेवो चमके बिजुरीसी ।।धृ।।**
**घन सम सुखदे आलापही तान की लरियाँजचे तब कहो कैसी ।।१।।**

अर्थ :- गायन कसे असावे ? तानाच घ्यायच्या झाल्यावर त्या अशा घ्या की आकाशात जणू वीज चमकते आहे. पण नुसत्याच विजा चमकल्या तर सुख मिळेल काय ? तें सूख मेघच देतात. त्यामुळे गायनात महत्व मेघासारख्या आलापांचे असते. तानांच्या भेडोळ्यात नाही.

## स्थायी

| ० | | | २ | | ३ | | ० | | | २ | | ३ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | प | सां | सां | सां | - | सांनीपप | गगरेसा |
| | | | | | | | त | नि | क | सी | ऽ | ऽऽऽऽ | ऽऽऽऽ |
| रे | - | सा | सा | रेग | सा | - | रे | नी़ | प़ | सा | ग | रे | - |
| ता | ऽ | न | अै | ऽऽ | सी | ऽ | ले | ऽ | वो | च | म | के | ऽ |
| प | सां | सां | सांनीपनी | सांरेंगरें | सांनीपप | गेरेसासा | | | | | | | |
| बि | जु | री | सीऽऽऽ | ऽऽऽऽ | ऽऽऽऽ | ऽऽऽऽ | | | | | | | |

## अंतरा

| ० | | | २ | | ३ | | ० | | | २ | | ३ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | सां | नी | प | ग | रे | ग | प |
| | | | | | | | घ | न | स | म | ऽ | सु | ख |
| सां | - | सां | सां | रेंगं | सां | सां | रें | नी | प | पनी | सांगं | रें | रें |
| दे | ऽ | अ | ला | ऽऽ | प | ही | ता | ऽ | न | कीऽ | ऽऽ | ल | रि |
| सां | - | सां | सां | रेंगं | सां | सां | प | सां | प | सांनीपनी | सांरेंगंरें | सांनीपप | गेरेसासा |
| याँ | - | ज | चे | ऽऽ | त | ब | क | हो | ऽ | कैऽऽऽ | ऽऽऽऽ | सीऽऽऽ | ऽऽऽऽ |

# राग - हंसध्वनि - तीनताल (म. ल.)

**पतिया लिख भेजी मोरे पीको, जबतें बिलम किये पाति लिखन ।।धृ।।**
**जारे जारे जारे कागा-पिया का संदेसा ला रे -विकल मोरा जिया कर न ।।१।।**

अर्थ :- पत्राला अुशीर झाल्यामुळे कित्येक पत्र लिहिली त्यांना. पण त्यांच्या कडून कांही अुत्तर नाही. (म्हणून) हे 'कावळ्या' तांतडीने जा आणि 'तिकडली' खुशाली घेऊन ये, इकडे माझे प्राण व्याकुळ झाले आहेत (म्हणून अुशीर करुन नकोस)

या चीजेत तिच्या मनाची आतुरता चीजेच्या स्वरांतून आणि लयीतून स्पष्ट होत आहे.

## स्थायी

| + | २ | ० | ३ |
|---|---|---|---|
| | | प | गंरें सां नि प |
| | | प | तिऽ या लि ख |
| पसां - - पप | ग प रे सा | नीरे - सा, नि | रे नि प प |
| भे ऽ ऽ जीऽ | ऽ ऽ मो रे | पी ऽ को, ज | ब तें ऽ बि |
| सा - सा, सा | ग - प नि | सां गंरें सां । | |
| ल ऽ म, कि | ये ऽ पा ति | लि खऽ न । | |

## अंतरा

| + | २ | ० | ३ |
|---|---|---|---|
| | प नी | सांगं रें रे गंरें | सां - - प |
| | जा रे | जाऽ ऽ रे जाऽ | रे ऽ का ऽ |
| सां - - - | प नी सांगं रें | गं सां - प | गरे सानि रे - |
| गा ऽ ऽ ऽ | पि या काऽ ऽ | सं दे ऽ सा | लाऽ ऽऽ रे ऽ |
| पप गरे सा, पग | प प गंरें सांनि | प गंरें सां । | |
| बिऽ कऽ ल मोऽ | ऽ रा जिऽ याऽ | क रऽ न । | |

## राग – हंसध्वनी – अेकताल (द्रुतलय)

ता नोम् तानोम् तन देरे तना तदरे दानी, नादिर दिर दानी, तुंदिर् दिर् तदीम् तदीम् तदीम् ।।धृ।।

दानी तोम् तोम् तदरे तदरे, तदियनरे तानोम् तारे तदरे दानी, दानी तोम् तन देरेना, देरेना ना दिर दिर दानी तुंदिर दिर तदीम् तदीम् तदीम् ।।१।।

### स्थायी

| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सां | - | सां | प | निसां | गंरें | सां | सां | नी | प | गरे | सा |
| ता | ऽ | नो | म | ताऽ | ऽऽ | नो | म | त | न | देऽ | रे |
| रे | ग | - | प | ग | रे | सा | नि़ | प़ | नी़ | सा | ग. |
| त | ना | ऽ | त | द | रे | दा | नी | ना | दिर | दिर | दा |
| रे | ग | प | नी | गं | रें | रें | नी | प | प | गरे | सा। |
| नी | तुं | दिर | दिर | त | दी | म | त | दी | म् | तऽ | दीम्। |

## अंतरा

| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नी | प | सां | सां | सां | सां | प | नी | सां | रेंगं | सांरें | सां |
| दा | नी | तो | म् | तो | म् | त | द | रे | तऽ | दऽ | रे |
| प | नी | सां | गं | रें | - | नि | प | प | नी | रें | - |
| त | दि | य | न | रे | ऽ | त | नो | म् | ता | रे | ऽ |
| नि | रें | गं | गं | - | सां | प | सां | सां | नी | प | ग |
| त | द | रे | दा | ऽ | नी | दा | नी | तो | म् | त | न |
| रे | सा | रे | - | सा | सा | रे | - | प़ | नी़ | सा | ग |
| दे | रे | ना | ऽ | दे | रे | ना | ऽ | ना | दिर | दिर | दा |
| रे | ग | प | नी | गं | रें | रें | नी | प | प | गरे | सा। |
| नी | तुं | दिर | दिर | त | दी | म् | त | दी | म् | तऽ | दीम्। |

# राग – कलावती – अेकताल (म. ल.)

**मीठी बाते करो मोसे श्याम प्यारे, प्यासी अिसकी हूं मैं ॥धृ॥**
**और देखूं तो हमसे सदा रूठत – लरत सतत बैरिन जैसी कोअी मै ॥१॥**

अर्थ :- यात विनवणी आहे. 'मी तुझ्या प्रेमाच्या दोन शब्दांसाठी भुकेली आहे. पण मी पहाते आहे कीं, तू माझ्याशी तिन्ही त्रिकाळ भांडत असतोस, रुसत असतोस. जणू मी तूझी वैरीण आहे.'

## स्थायी

| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सा | ग | प | ध | नी | धप | ग | सा | - | पनी | - | ध़ |
| मी | ठी | बा | ऽ | ऽ | तेंऽ | क | रो | ऽ | मो | ऽ | से |
| सा | - | - | सा | - | - | ग | प | ध | सांनी | धप | ग |
| श्या | ऽ | ऽ | म | ऽ | ऽ | प्या | ऽ | ऽ | ऽ | रेऽ | ऽ |
| ग | प | ध | सां | - | - | सां | गं | सां | प | नी | धप |
| प्या | ऽ | सी | ऽ | ऽ | ऽ | अि | स | की | हूं | ऽ | मैंऽ |

## अंतरा

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नी | नी | धप | पग | प- | प | ध | सां | - | नी | ध | सां |
| औ | ऽ | रऽ | दे | ऽ | खूं | तो | ऽ | ऽ | ह | म | से |
| सां | गं | पं | गं | गं | सां | पनी | ध | प | ग | ग | प |
| स | दा | ऽ | रू | ठ | त | ल | र | त | स | त | त |
| ग | प | ध | नी | ध | प | ग | - | गप | ग | - | सा। |
| बै | ऽ | रि | न | जै | ऽ | सी | ऽ | कोऽ | अी | ऽ | मै। |

## राग – भूप – आडाचौताल (साधारण म. ल.)

**मोरे मन बसकर मन मोहन काहे रे छलत आज ? अैसी कैसी पीत तुमरी हमरे संग, हम कछु समझत ना ॥धृ॥**

**दोउु मन जब अेक होत, लेन देन की कहा बात तब, पर देखत हूं मन–दरपन नित, हमरे तुम रहे न आज ॥१॥**

अर्थ :-आडा चौतालात, विशेषत : मध्यलयीन, कमी चीजा दिसून येतात. या तालाचा डौल काही वेगळाच आहे.

'' माझ्या मनांत विराजमान झाला असून सुध्दां तू मला कां छळतोस ? अशी कशी तुझी प्रेमाची रीत ? मला तर कांही कळतच नाही. एक गोष्ट मला ठाऊक आहे कीं, जेव्हा दोन मने अेकजीव होतात तेव्हां देण्याघेण्याची गोष्टच कुठे येते ? पण मी माझ्या मनाच्या आरशात पहाते कीं तू माझा राहिला नाहीस.''

### स्थायी

| + | | २ | | ० | | ३ | | ० | | ४ | | ० | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सा | सां | धप | गरे | सासा | सारे | साध | सारे | ग | परे | ग | गध | प,रे | गग |
| मो | रे | मन | बस | कर | मन | मोऽ | हन | का | हेऽ | रे | छल | त,आ | ऽज |
| ग- | पसां | ध | सां | सांसां | सांसां | सांरें | सांध | -प | गरे | गप | धसां | धप | गरेसा |
| अैऽ | सी,कै | सी | पी | त,तु | मरी | हम | रे,सं | ऽग | हम | कछु | सम | झऽ | तऽना |

### अंतरा

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गरे | गप | सांध | सां- | सांसां | -सां | सांध | धसां | सां | सां | सांरें | गं,सां | -ध | पप |
| दोउु | मन | जब | अेऽ | कहो | ऽत | लेऽ | नदे | न | की | कहा | ऽ,बा | ऽत | तब |
| गरे | गप | धसां | धप | गरे | गरे | गरे | सासा | गरे | गप | धसां | सांध | प,ग | रेसा |
| पर | देऽ | खत | हूंऽ | मन | दर | पन | नित | हम | रेऽ | तुम | रहे | न,आ | ऽज |

## राग – भूप – रुपक (म. ल.)

**महादेव देवन देव हलाहल पिये जगत कल्याण ।।धृ।।**
**तबसे नीलकंठ कहावे पन्नग धारे दाह दमन ।।१।।**

अर्थ :- जगाच्या कल्याणासाठी देवांचे देव - महादेव यांनी विष प्राशन केले. तेव्हा पासून त्यांना नीलकंठ म्हणू लागले शरीराला होणारा दाह शमन करण्यासाठी त्यांना गळ्यात अलंकारा प्रमाणे नाग धारण करावे लागले.

### स्थायी

| ० | | | १ | | २ | | ० | | | १ | | २ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | ध़ | सा | रे |
| | | | | | | | | | | | म | हा | ऽ |
| प | रेग | ग | ग | रे | गध | प | रे | ग | सा | ग | प | सां | ध |
| दे | ऽऽ | व | दे | ऽ | वऽ | न | दे | ऽ | व | ह | ला | ह | ल |
| सां | - | सां | प | ग | पध | प | रेग | - | सा। | | | | |
| पी | ऽ | ये | ज | ग | तऽ | क | ल्याऽ | ऽ | ण। | | | | |

### अंतरा

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | ग | प | सां | ध |
| | | | | | | | | | | त | ब | से | ऽ |
| सां | - | सां | सां | ध | सां | रेंगं | सां | धसां | प | प | ग | पध | प |
| नी | ऽ | ल | कं | ऽ | ठ | कऽ | हा | ऽऽ | वे | प | ऽ | न्नऽ | ग |
| रे | ग | सा | गप | धसां | ध | प | रे | ग | सा। | | | | |
| धा | ऽ | रे | दाऽ | ऽऽ | ह | द | म | ऽ | न। | | | | |

# राग - देशकार - रुपक (मध्यलय)

**भोरं ही आये मोरे प्रीतम प्यारे ॥धृ॥**
**जैसे आये सुख संग लाये दु:ख को हराये प्रीतम प्यारे ॥१॥**

अर्थ :- आपला जिवलग पहाटे पहाटे आला. तर त्याचा आनंद काय वर्णावा ? नुसताच आला नाही तर दु:खाचे हरण करणारे सुख घेऊन आला.

## स्थायी

| ० | | | १ | | २ | | ० | | | १ | | २ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प | ग | ध | प | ग | - | - | सा | - | सा | रे |
| | | | भो | ऽ | र | ही | आ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ |
| ध़ | सा | सा, | प | ग | प | - | ध | सां | सां | प | ग | ध | प |
| ये | ऽ | ऽ, | मो | ऽ | रे | ऽ | प्री | ऽ | ऽ | ऽ | ऽ | त | म |
| ग | - | सा | | | | | | | | | | | |
| प्या | ऽ | रे। | | | | | | | | | | | |

## अंतरा

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ग | प | सां | ध | सां | - | सां | सां | ध | सां | रें |
| | | | जै | ऽ | से | ऽ | आ | ऽ | ये | सु | ख | सं | ग |
| सां | धसां | प | प | ग | पध | प | ग | - | सा | गप | धसां | ध | प |
| ला | ऽऽ | ये | दु | ख | कोऽ | ह | रा | ऽ | ये | प्रीऽ | ऽऽ | त | म |
| ग | - | सा। | | | | | | | | | | | |
| प्या | ऽ | रे। | | | | | | | | | | | |

# राग – देशकार – तीनताल (म. ल)

**मधुमास की मधुरात आयी मधु प्रीतम अैसो मधु दिन पायो री ।।धृ।।**
**मधु बातकी अब तो झलक अुठेंगी पलन लगेंगी पलकन मोरी ।।१।।**

अर्थ :-आनंद, अुत्साह, तडफ इत्यादी भावना या रागात खुलून दिसतात. ही चीज अेका नवविवाहितेचे हृद्गत आहे तिच्या मनात येणाऱ्या मधुचंद्राच्या सुखद कल्पनांचे हें शब्दचित्र आहे. मधुमासाची मधुरात्र आली. मधुप्रियकराचे मिलन अशा मधुदिनी होणार आहे. अशावेळी मधूर हितगुजाची बहार अुठेल-मग अशा वेळी क्षणभर तरी माझा डोळा लागेल कां ?

## स्थायी

| + | | | | २ | | | | ० | | | | ३ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | ग | प | ध | सां | ध |
| | | | | | | | | | | | म | धु | मा | ऽ | स |
| सां | - | - | - | प | - | ग | - | प | - | -, | प | ग | गप | ध | प |
| की | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | री | ऽ | ऽ, | म | धु | राऽ | ऽ | त |
| ग | - | - | - | सा | - | रे | ध़ | सा | - | -, | सा | ध़ | सा | - | सा |
| आ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | यी | ऽ | ऽ, | म | धु | प्री | ऽ | त |
| प | ग | प | - | - | - | सां | ध | सां | - | -, | प | ग | गप | ध | प |
| म | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | अै | ऽ | सो | ऽ | ऽ, | म | धु | दिऽ | ऽ | न |
| ग | - | - | - | सा | - | रे | ध़ | सा | - | - | । | | | | |
| पा | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | यो | ऽ | री | ऽ | ऽ | | | | | |

## अंतरा

| + | | | | २ | | | | ० | | | | ३ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | ग | प | ध | सां | ध |
| | | | | | | | | | | | म | धु | बा | ऽ | त |
| ध | सां | ध | सां | - | - | सां | रें | ध | सां | -, | ध | ध | सां | - | रें |
| की | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | अ | ब | तो | ऽ | ऽ, | झ | ल | क | ऽ | अु |
| सां | - | - | - | ध | - | प | - | ध | सां | -, | गं | रें | सां | - | रें |
| ठे | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | गी | | ऽ, | प | ल | न | ऽ | ल |
| सां | - | - | - | ध | - | प | - | ध | सां | | -,प | ग | गप | ध | प |
| गे | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | गी | ऽ | | ऽ,प | ल | कऽ | ऽ | न |
| ग | - | - | - | सा | - | रे | ध़ | सा | - | - | । | | | | |
| मो | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | री | ऽ | ऽ | । | | | | |

# राग – देशकार – अेकताल (म.ल)

**जागो जागो जागो नंदलाल भोंर भयो, ठाढ़े सब**
**गोपबाल ललकारत तेरो नाम ॥धृ॥**

ले ले ले लकुट कमरि, मोर मुकुट बाँसन बाँसुरि अधीर धेनु भअी सारी, हुँकारत तोहे श्याम ॥१॥

अर्थ :- यशोदा लाडक्या कन्हैय्याला म्हणते ''अूठ अूठ ! पहाट झाली तुझे सर्व सवगडी आले आहेत. आणि तुझ्या नावाने हाका मारीत आहेत. अरे ! चल तयारीला लाग ! तुझी काठी घे, मोर पंखी मुकुट घाल, बासरी घे. गायी अधीर झाल्या आहेत आणि तुझ्या नावाने हुंकारत आहेत.

## स्थायी

| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (ध)सां | - | सां | प | - | प | ध | ग | प | - | ध | सां |
| जा | ऽ | गो | जा | ऽ | गो | जा | ऽ | गो | ऽ | नं | द |
| प | - | - | - | - | प | गप | ध | -प | ग | सा | - |
| ला | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ल | भोंऽ | ऽ | ऽर | भ | यो | ऽ |
| रे | ध़ | सा | - | प | ग | प | - | धसां | प | - | प |
| ठा | ऽ | डे | ऽ | स | ब | गो | ऽ | पऽ | बा | ऽ | ल |
| प | प | गं | रें | सां- | पध | सां | - | धप | गरे | सा | सा |
| ल | ल | का | ऽ | रऽ | तऽ | ते | ऽ | रोऽ | नाऽ | ऽ | म |

## अंतरा

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |
| ग | - | प | - | सां | ध | सां | सां | सां | सांरें | ध | सां |
| ले | ऽ | ले | ऽ | ले | ऽ | ल | कु | ट | कऽ | म | रि |
| सां | ध | ध | सां | सां | सां | सां | रेंग | सांध | धसां | प | प |
| मो | ऽ | र | मु | कु | ट | बाँ | सऽ | नऽ | बाँऽ | सु | रि |
| प | ध | प | ध | - | ध | प | ध | सां | प | - | प |
| अ | धी | र | धे | ऽ | नु | भ | अी | ऽ | सा | ऽ | री |
| प | - | प | गंरें | सांसां | पध | सां | - | धप | गरे | सा | सा। |
| हुँ | ऽ | का | ऽऽ | रऽ | तऽ | तो | ऽ | हेऽ | श्याऽ | ऽ | मा। |

# राग – नारायणी – तीनताल (म.ल)

**आनंद मनावो, मंगलदिन आज, यशोदा के सदन**
**नंदलाल लायो ।।धृः।।**
**कंसदमन कर जैसे आयो, धरती – आकाश**
**अमित गुण गायो ।।१।।**

अर्थ :- ज्या ज्या रागात पंचममुक्त असतो, स्वैर असतो, प्रधान असतो असे विशेषतः शुद्ध स्वरांचे, राग आनंददायी असतात.

''आजचा दिवस मोठा मंगलकारी आहे. चला आनंदोत्सव करू. असा हा मंगल दिवस यशोदेच्या घरी तिच्या लाडक्याने आणलेला आहे. ज्या क्षणी कंसाचा वध करून तो परतला दशदिशातून त्याच्यावर स्तुतीसुमनांचा वर्षाव झाला.''

## स्थायी

| + | | | | २ | | | | ० | | | | - | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | प | पध | म | - | रे |
| | | | | | | | | | | | आ | नंऽ | द | ऽ | म |
| म | - | म, | सा | रे | म | प | नी | ध | - | प | म | प | ध | सां | रें |
| ना | ऽ | वो, | मं | ग | ल | दि | न | आ | ऽ | ज, | ज | शो | दा | ऽ | के |
| नी | ध | म, | नी | ध | म | - | रेम | सा | रे | प | । | | | | |
| स | द | न, | नं | द | ला | ऽ | लऽ | ला | यो | ऽ | । | | | | |

## अंतरा

| + | | | | २ | | | | ० | | | | - | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | म | प | ध | सां | ध |
| | | | | | | | | | | | कं | ऽ | स | ऽ | द |
| सां | ऽ | सां | ध | सां | रें | मं | रें | नी | ध | प, | नी | धप | म | - | प |
| म | ऽ | न | क | र | जै | ऽ | से | आ | ऽ | यो, | ध | रऽ | ती | ऽ | आ |
| म | - | रे | सा | रे | म | प | नी | ध | - | प | । | | | | |
| का | ऽ | श | अ | मि | त | गु | ण | गा | ऽ | यो | । | | | | |

# राग – भवानी

बिलावल थाटातून अुत्पल होणाऱ्या या रागाला हेमवती असे ही नांव आहे. कै. पं. नारायण राव व्यास यांनी गायिलेल्या ध्वनिमुद्रीकेत मात्र भवानी हेच नांव दिलेले आहे.

या रागाच्या आरोहावरोहात. गंधार पंचम व निषाद हे स्वर वर्ज्य आहेत. त्यामुळे हा चार स्वरांचा राग होतो. कै. पं. भातखडे यांच्या मतानुसार राग कमीत कमी पाच स्वरांचा असला पाहिजे. पण कर्नाटक पद्धतीत चार स्वरांचेही राग आहेत. असल्या रागांत विस्तार फार करतां येत नाही. समय रात्रीचा दुसरा प्रहर. रुचिवैचित्र्य आणि बैठकीत रंगत भरण्यासाठी हा राग बरा वाटतो.

आरोहावरोह :- सा रे म ध सां । सां ध म रे सा.

स्वर विस्तार - ध़सा, सारे ध़सा, रेमरेसा ध़सा, रेम, मरेसा, ध़सारेमरेसा. रेमध, धम, मरेसा. सारेमध, धम, मधसांधमरे, रेमध़सा. मध सां, ध सांरें सां धम, मध मरे धसां मंरे सांध, म ध सां रें सांध मरे, ध़सा.

# राग - भवानी - तीनताल (मध्यलय)

**गुन गावत हरी के माओी, कहत हमतो बड़ाभागनकी ॥धृ॥**
**जैसो ही देखत कर में लेवत, अपने लाल के लाड़ करत ॥१॥**

मातृवात्स्यल्याने भरलेली ही चीज आहे.

## स्थायी

| + | | | | २ | | | | ० | | | | ३ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | रे | म | धसां | रें | सां | ध | म | म | रे | सा |
| | | | | | | गु | न | गाऽ | ऽ | व | त | ह | री | के | ऽ |
| रे | - | - | - | सा | - | - | - | म | रे | म | ध | ध | म | म | ध |
| मा | ऽ | ऽ | ऽ | अी | ऽ | ऽ | ऽ | क | ह | त | ह | म | तो | ब | ड |
| धसां | रें | सां | ध | ध | म | । | | | | | | | | | |
| भाऽ | ऽ | ग | न | की | ऽ | । | | | | | | | | | |

## अंतरा

| + | | | | २ | | | | ० | | | | ३ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | म | म | रे | म | ध | - | म | ध |
| | | | | | | | | जै | सो | ही | ऽ | दे | ऽ | ख | त |
| सां | सां | सां | - | रें | ध | सां | सां | मं | मं | रें | सां | ध | ध | म | - |
| क | र | मे | ऽ | ले | ऽ | व | त | अ | प | ने | ला | ऽ | ल | के | ऽ |
| मध | सांरें | सां | ध | म | रेसा | । | | | | | | | | | |
| लाऽ | ऽऽ | ड | क | र | तऽ | । | | | | | | | | | |

# राग – देवगिरी बिलावल – अेकताल (म. ल)

**मै सन लागी तोरी प्रीत सांवरो कन्हाअी, सरसी जीवन – बेली ।।धृ।।**

**अँसुवन जल सींची सींची, प्रेमबेल बोअी, अब तो बेलि ये बहरी प्रेमांगनमें कन्हाअी ।।१।।**

अर्थ :- प्रेम भक्तीचा भाव या चीजेत आहे ''हे कृष्णा ! माझ्यावर तुझी प्रीत जडताच माझी जीवन-वेल फूलून आलेली आहे. माझ्या नयनातील अश्रूंचे सिंचन करून ही प्रेमवेल मी जोपासली. माझ्या प्रेमांगणात ती आता बहरून आली आहे.''

## स्थायी

| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सारे | गम | गरे | ग | सा | - | ध़ | नीप़ | प़ | ग | - | ग |
| मैऽ | ऽऽ | सऽ | न | ला | ऽ | गी | ऽऽ | ऽ | तो | ऽ | री |
| ग | म | रे | ग | प | प | ध | सां | ध | म | ग | रे |
| प्री | ऽ | त | सां | ऽ | व | रो | ऽ | क | न्हा | ऽ | अी |
| ग | प | धनी | सां | प | ध | म | ग | रे | ग | सा | ध़। |
| स | र | सीऽ | ऽ | जी | ऽ | व | न | बे | ऽ | ली | ऽ। |

## अंतरा

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ग | प | नीध | नी | सां | सां | सां | - | रेंगं | सां | - | सां |
| अ | सु | व | न | ज | ल | सी | ऽ | चीऽ | सीं | ऽ | ची |
| सां | - | सां | ध | नी | प | प | धनी | धप | मम | ग | रे |
| प्रे | ऽ | म | बे | ऽ | लि | बो | ऽऽ | ऽऽ | अीऽ | ऽ | ऽ |
| सा | रे | ग | मग | रेग | रे | सा | - | धनी़ | प़ | ग | - |
| अ | ब | तो | बेऽ | ऽऽ | लि | ये | ऽ | बऽ | ह | री | ऽ |
| ग | रे | ग | प | प | प | ध | सां | ध | म | म | गरे। |
| प्रे | ऽ | मां | ऽ | ग | न | में | ऽ | क | न्हा | ऽ | अीऽ। |

# राग – देवगिरी बिलावल – तीनताल (म.ल)

**मनके मोती तुम मेरे यशके सर ताज बने मोरे ।।धृ।।**
**बहुगुनी तुम, मोमें कछु नाही, अवगुणीको तुम गुनी कियोरे ।।१।।**

अर्थ :- तू माझ्या मनाचा मोती आहेस - यशाचा मुकूट झालेला आहेस. वास्तविक पहातां माझ्यात कोणताही गूण नसताना अेका अवगुणीला तू गुणी करून सोडलं आहेस.

सकाळचा हा शुद्ध स्वरांचा राग आहे. ह्यामुळे या चीजेला भावार्थाच्या दृष्टीने आगळेपणा आहे ज्यात समर्पणाची भावना आहे.

## स्थायी

| – | २ | ० | ३ |
|---|---|---|---|
| | ध़ नी़ | रे ग म ग | - सा धनी़ प़ |
| | म न | के ऽ ऽ मो | ऽ ती तुऽ म |
| $^{प}$ग - - म | ग रे ग रे | ग प -, प | ध म - गरे |
| मे ऽ ऽ ऽ | रे ऽ, य श | के ऽ ऽ, स | र ता ऽ जऽ |
| $^{प}$ग पनी ध $^{ग}$म | - गरे । | | |
| ब नेऽ ऽ मी | ऽ रेऽ । | | |

## अंतरा

| | | | |
|---|---|---|---|
| | | ग प $^{नी}$ध नी | सां सां सां - |
| | | ब हु गु नी | तु म मो ऽ |
| धनी प प प | धनी धप म ग | ग प $^{नी}$ध नी | सां नी प ध |
| मेंऽ ऽ क छु | नाऽ ऽऽ ही ऽ | अ व गु नी | को ऽ तु म |
| ग पनी - ध | म गरे । | | |
| गु नीऽ ऽ कि | यो रेऽ । | | |

# राग – खमाज – रूपक (मध्यलय)

**खेलन को नही आओी होरी, संग की सखी मोरी ।।धृ।।**
**कैसी अकेली खेलूंगी, कान्ह करे बरजोरी ।।१।।**

अर्थ :- रूपक तालात ठुमऱ्या कमी आहेत म्हणून ही ठुमरी रचली. राधा अन् तिच्या सर्व सख्या ठरवितात - की कृष्णाला अेकटे गाठून त्याला रंगाने मारवायचे. पण तिचा बेत फसतो. अन् ती म्हणते ''माझ्या बरोबरीच्या सख्या अजून कशा आल्या नाहीत ? इकडे तर हा कृष्ण येऊन टपलेला आहे. अेकटी मी आता काय करणार ? आणि हा मनमानी करणार.

## स्थायी

| ० | | | १ | | २ | | ० | | | १ | | २ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ग | ग | म | प | ध | नि | सां | नि | ध | म | म | प | ग | सा |
| खे | ल | न | को | ऽ | न | ही | आ | ऽ | ऽ | अी | ऽ | हो | री |
| नि | नि | सां | - | निसां | सां | प | पसां | निंरें | - | नी | मप | ग | सा। |
| सं | ग | की | ऽ | ऽऽ | ऽ | स | खीऽ | ऽऽ | ऽ | ऽ | ऽऽ | मो | री। |

## अंतरा

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नि | नि | नि | सां | - | सां | - | पसां | निंरें | - | नी | - | धम | प |
| कै | सी | अ | के | ऽ | ली | ऽ | खेऽ | ऽऽ | ऽ | लूं | ऽ | गीऽ | ऽ |
| ग | ग | म | प | ध | नि | सां | नी | - | ध | म | प | ग | सा। |
| का | न्ह | क | रे | ऽ | ब | र | जो | ऽ | ऽ | ऽ | ऽ | री | ऽ। |

# राग - सरस्वती - अेकताल (विलंबित)

**अे माई मेरो धन धन भाग ।।धृ।।**
**धन आज की घरी, धन यह पल**
**मुहरत, आज आये मोरे शाम ।।१।।**

अर्थ :- सरस्वती हा कर्नाटक पद्धतीचा राग आहे. यात मध्यम तीव्र, निषाद कोमल आहे. आरोहात गंधारवर्ज्य, निषादवक्र आहे. अवरोहात गंधार पूर्णपणे वर्ज्य आहे. तीव्र मध्यम भावनेची उत्कटता दाखवितो तर कोमल निषाद कारूण्य भाव दर्शवितो.

आतुरतेने वाट पहात असलेल्या अेका मीलनोत्सुक युवतीचं भाग्य उदयाला येतं. ती आपल्या आईला म्हणते 'मी आज धन्य झाले. आजची घडी, क्षण खरोखर शुभ म्हटला पाहिजे. कारण या शुभमुहूर्तावर माझा शाम आलेला आहे.' (ज्याची मी आतुरतेने वाट पहात होते)

## स्थायी

| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | रेमं,प | $^{प}$नीपमं |
| | | | | | | | | | | होऽऽ | ऽ,माअी |
| $^{मं}$प | रे | $^{ध}$सा | - | $^{ध}$सा | धसारे | $^{सा}$नी | धसा | धसारेमं | प,रेसा | ।।धृ।। | |
| मे | ऽ | ऽ,रोऽ | ऽ | ध | ऽऽऽ | न | ऽ,धन | भाऽऽऽ | ऽ,गऽ | | |

## अंतरा

| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | प-प | धसांप |
| | | | | | | | | | | धऽन | आऽज |
| $^{प}$सां | - | $^{सां}$ध | सां | $^{सां}$ध | सांध | $^{ध}$सां | सां | परेंनी | -पध | नीध | धसां |
| की | ऽ | घ | री | ध | नऽ | य | ह | पल | ऽ,ऽऽ | मुऽ | हऽ |
| मं | प | रे | मं | प | धसां | मं | प | रे | $^{ध}$सां | ।।१।। | |
| र | त | आ | ज | आ | येऽ | मो | रे | श्या | म | | |

# राग - सरस्वती - तीनताल (म. ल.)

**घर मोरे आये नंदलाल, आनंद की आओी छबी आज ।।धृ।।**

**जन की रखूंगी लाज काहे को मै री आज पूरन करुं मनके सबही काज।।१।।**

अर्थ :- विलंबीत ख्यालाच्या अर्थाला अनुसरून ही चीज बांधलेली आहे. (काही गुणी विद्वानांचं असं मत आहे की, विलंबित ख्यालाच्या भावाला अनुसरून मध्यलयीची चीज असावी.)

'आज माझ्या घरी माझे नंदलाल आले आहेत. जणू आनंदाची साक्षात् मूर्तीच ! (ज्याची मी टक लावून वाट पहात होते तो माझा 'आनंद' आला असता) मी जनमनाची लाज कशाला धरूं ? मी माझं मनोवांच्छित पूर्ण करणार !

## स्थायी

| + | | | | २ | | | | ० | | | | ३ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | (प)सां | नी | ध | प | - |
| | | | | | | | | | | | घ | र | मो | रे | ऽ |
| सां | - | - | - | धसां | ध | सां | रें | (सां)नी | - | धप | मं | - | प | - | प |
| आ | ऽ | ऽ | ऽ | येऽ | ऽ | नं | द | ल | ऽ | लऽ | आ | ऽ | नं | ऽ | द |
| धसां | - | - | मं | प | मं | मंध | प | रे | - | सा | । | | | | |
| कीऽ | ऽ | ऽ | आ | ऽ | यी | छऽ | वी | आ | ऽ | ज | । | | | | |

## अंतरा

| + | | | | २ | | | | ० | | | | ३ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | प | प | (मं)ध | - | प |
| | | | | | | | | | | | ज | न | की | ऽ | र |
| सां | - | - | - | सां | - | सां | ध | सां | - | - -, | ध | सां | धसां | रें | रें |
| खूं | ऽ | ऽ | ऽ | गी | ऽ | ला | ऽ | ज | ऽ | ऽ, | का | ऽ | हेऽ | ऽ | को |
| नी | - | - | - | पध | - | - | - | सांनी | - | प | मं | मं | प | - | प |
| मै | ऽ | ऽ | ऽ | ऽऽ | ऽ | ऽ | री | आऽ | ऽ | ज, | पू | र | न | ऽ | क |
| धसां | - | - | ध | प | मं | पध | प | रे | - | सा | । | | | | |
| रुंऽ | ऽ | ऽ | म | न | के | सब | ही | का | ऽ | ज | । | | | | |

# राग – भिन्नषड्ज

या रागात सर्व स्वर शुद्ध येत असून ऋषभ, पंचम वर्ज्य असल्याने जाति ओडव ओडव आहे. वादी, संवादी मध्यम, षड्ज मानायला हरकत नाही. गान समय रात्रीचा दुसरा प्रहर बरा दिसेल याचा थाट कै. भातखंडे यांच्या मतानुसार बिलावत मानावा लागेल.

हे रागरूप प्रभावी व मधुर आहे. मध्यमावर न्यास चांगला दिसतो.

आरोहावरोह स्वरूप - सा ग म ध नी सां ।
सां नी ध म, ग म सा ध़ नी़ सा.

स्वर विस्तार - ध़ नी़ सा, म़ ध़ नी़ सा, ध़ नी़ सा ग, म ग सा, नी़ सा ध़ नी़ सा म, म ग, म सा ध़ नी़, सा ग म ग सा, सा ग म ध ग म, ध़ नी़ सा ग, नी ध म, म ग, म ग सा. म ध नी, नी ध म, म ग नी, नीधम, मग, मगसा, ध़नी़म़ध़नी़सा, सागमधनी, नीसां धमधनीसां, धनीगंसा, मंसां, मंगंसांनी, नीसांधम, मधनी नीधम, गमगसा.

# राग - भिन्नषड्ज - रुपक (म. ल.)

**श्याम मोहे दे दे मोरी गगरी, घर नही अेक जल की बूँदनी ॥धृ॥**

**अरे मोरी मान मान कन्हाअी, कैसे घर जाअूं हो गअी रजनी ॥१॥**

अर्थ :- संध्याकाळ होऊन गेलेली आहे अन् घरात पाण्याचा थेंब नाही. नेमका अशा कातर वेळी पाणवठ्यावर तो तिची घागर घेऊन उभा आहे. ''कृष्णा दे रे ती घागर-घरांत पाण्याचा अेक थेंब नाही. अरे माझं अेक. अितकी रात्र झालेली असताना घरी कशी जाऊ?

## स्थायी

| ० | | | १ | | २ | | ० | | | १ | | २ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ग | म | ध | नि | सां | - | नीध | साम | - | नि़ | सा |
| | | | श्या | म | मो | हे | दे | ऽ | ऽऽ | दे | ऽ | मो | री |
| ध़ | नि़ | सा | नि़ | सा | ध़ | नि़ | साम | - | म | म | ध | नि | (सां |
| ग | ग | री | घ | र | न | ही | अेऽ | ऽ | क | ज | ल | की | (ऽ |
| धनि | ग | म | | | | | | | | | | | |
| बूँऽ | द | नी | | | | | | | | | | | |

## अंतरा

| ० | | | १ | | २ | | ० | | | १ | | २ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ध | म | ध | नि | सां | - | सां | सां | ध | ध | गं |
| | | | अ | रे | मो | री | मा | ऽ | न | मा | ऽ | न | ऽ |
| सां | नि | सां | नि | सां | ध | म | ध | नि | सां | साम | - | नि़ | सा |
| क | न्हा | अी | कै | (से) | घ | र | जा | ऽ | अूं | होऽ | ऽ | ग | अी |
| ध़ | नि़ | सा | | | | | | | | | | | |
| र | ज | नी | | | | | | | | | | | |

# राग – भिन्नषड्ज – एकताल (म. ल.)

**राम जनम आज ! दशरथ मन अति आनंद ॥धृ॥**
**ठाडे सकल नगर जन, अति आतूर पुलकित मन देखनको मुख मिलिंद ॥१॥**

अर्थ :- आज प्रभुरामचंद्र जन्म घेणार. दशरथाच्या मनांत किती आनंद आहे ! (इकडे) अति अधीर अन् आनंदित मनाने सर्व प्रजा रामचंद्रांचे कमल मुख पाह्यला उभी आहे.

## स्थायी

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| + | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |
| म | - | - | सा | - | सा | ध़ | नि़ | - | सा | - | ग |
| रा | ऽ | ऽ | म | ऽ | ज | न | म | ऽ | आ | ऽ | ज |
| सा | ग | म | ध | नि | सां | ध | (सां) | ध | म | ग | -सा |
| द | श | र | थ | म | न | अ | (ति) | आ | नं | ऽ | ऽद |

## अंतरा

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| म | - | नि | ध | नि | नि | सां | नि | सां | नि | सां | सां |
| ठा | ऽ | डे | ऽ | स | क | ल | न | ग | र | ज | न |
| सां | ध | ध | गं | सां | सां | सां | ध | नि | ध | म | म |
| अ | ति | आ | तु | ऽ | र | पु | ल | कि | त | म | न |
| म | ध | नि | सां | धनि | ध | ग | ग | म | ग | - | सा। |
| दे | ऽ | ख | न | कोऽ | ऽ | मु | ख | मि | ली | ऽ | द। |

# राग - नीलांबरी - तीनताल (म. लय)

अर्थ :- कर्नाटक पद्धतीचा हा राग असूनही माझे प. पु. गुरूजी स्व. पं. ओंकारनाथ ठाकूर यांनी स्वत:च्या बुद्धी सार्मथ्याने 'नीलांबरी'चं कारुण्य मूर्तीत रुपांतर केलं. ते इतकं की, 'नीलाबरी ही अेक विलापिका होऊन बसली.

हा राग पुष्कळसा जयजयवंतीच्या जवळ येतो. पण हा प्रामुख्याने 'सिंधुरा' अंगाने गायला जातो. याचा आरोह जवळ जवळ 'सिंधुराचाच म्हणजे' सा, रे, म, प ध सां असून अवरोह

रें, नी, ध, म, ग, ग, ऽऽऽ रे, ग,सा ध नी ग, रे असा आहे.

कोमल गंधार यात खूप प्रबल आहे. अेकापूढे अेक येणारे दोन गंधार मग - ग हे या रागाचे खास स्वरांग आहे. यातच या रागाचं सर्व सामर्थ्य अभिप्रेत आहे. अेक विलापिका म्हणून मी ही चीज रचलेली आहे.

स्वर विस्तार -

धनीगरे, रेगसा, रेसाधनीगरे, मग, रेग,रेगसा, नीधप, मपधसा, नीसा, मग, रेग, रेगसा,

रे(सा) धनीगरे, नीप, धसा, रेम, मपग, सारेम, पग, रेगसा, रे(सा) धनीगरे, सारेमप, मपधग, रेमप, पध, नीध, मग, मगग, रेग, सा, सारेमप, धसां, नीसां, धनीगंरें, गंरेंनीधप,

मप,नीसां, धगंरें, मंगंगंरे, रेंसां, रेंनी धम, गग, रेगसा, रे(सा), धनीगरे, सारेमपधसां,

सांनीधम, गरेगरे, गसा, रे(सा), धनीगरे.
असे ह्या रागाचें साधारण स्वरुप आहे.

# राग – नीलांबरी – तीनताल (मध्यलय)

**साजन बिन मोरी रतिया कटत अब नाही सजनिया, सुनी सेजरिया ।।धृ।।**
**अुचट गअी निंदिया – पलभर न लागे पलक अखिया, अैसी बैरनिया भअी सेजरिया ।।१।।**

अर्थ :- सजणाशिवाय माझ्या रात्री जात नाहीत. माझी सेज रिकामी आहे. झोपण्याचा प्रयत्न करते. पण क्षणभरही झोप लागत नाही. याला कारण ही माझी वैरीण झालेली सेज !

## स्थायी

| + | | | | २ | | | | ० | | | | ३ | | | |
